# लाघव वेळा

(‘सकाळ–संध्याकाळ’ यावरील काव्यसंग्रह)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**लाघव वेळा** (‘सकाळ-संध्याकाळ’ यावरील काव्यसंग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
‘अे’ ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. ८, शके १९४५,
रविवार, दि. १७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-962298-3-2

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण

अनादी अनंत काळाला
सादर समर्पित !

# मनोगत

निमिषापासून युगापर्यंतच्या सीमेत काहीतरी बांधण्याचा प्रयत्न जरी आपण करत असलो तरी काळाला बांधणे सोपे नव्हे तर अशक्य आहे. काळ आपल्या खुणा ह्या क्षणाक्षणावर सोडत असतो, क्षणाक्षणाने जगण्याला नवे रूप मिळत असते.

प्रत्येक सकाळ नवजीवनाची आशा घेऊन उगवते तर प्रत्येक संध्याकाळ दमलेल्या तनमनाला निशेच्या कुशीत थोपटवत जाते. दुपार अशीच सीमेवर रेंगाळणारी, ना सकाळची ना संध्याकाळची!

सकाळ होते तेव्हा धरेवर, आकाशात, मानवी मनात होणारे बदल काव्यरूपात प्रकटले, संध्याकालीन छटा शब्दकुंचल्याने चितारल्या अन् कवितांची सकाळ फुटली, काव्याची संध्याकाळ नटली. या सकाळ, संध्याकाळच्या भावभावनांची पुंजी म्हणजेच हा काव्यसंग्रह होय.

वाचकांना मात्र काव्यातीत ओढ येईल असे वाटते.

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) सांज म्हणे वेडी ... ७
२) सांज गुलाबी टेकली ... ८
३) रम्य ही सकाळ ... ९
४) वाट लाजली लाजली ... १०
५) का पुन्हा हुरहूर ... १२
६) पहाट फुटली अंधाराला... १३
७) मी रानवाट ही गावठी ... १४
८) सूर्य उगवता ... १६
९) हे प्रेम ते न सखया ... १७
१०) भेट ठरू दे भावमल्मली... १८
११) अशी कांती तेजाळली ... १९
१२) होत काजवा जीवनी ... २०
१३) आज नभी लाजली ही उषा... २१
१४) अशी सफर बघ आयुष्याची... २२
१५) बाहुपाशी ये जराशी ... २३
१६) चंद्राआडचं आभाळ ... २४
१७) रंग लेऊन सर्गाचे ... २६
१८) अन संध्येचा स्वर गहिवरला... २७
१९) सकाळराणीचा सोहळा ... २८
२०) नीलसागरी नौका ... ३०
२१) सकाळी मोगऱ्याच्या ... ३१
२२) कोवळी सकाळ ... ३२
२३) सकाळी सकाळी ... ३३
२४) काल तिन्ही सांजेला ... ३४
२५) प्रसन्न वेळी ... ३६
२६) सोनसकाळ आलिया ... ३७
२७) भल्या पहाटे प्राचीला ... ३८
२८) रोज प्रभाती सृष्टीने ... ४०
२९) एक अनोखे मंथन ... ४१
३०) किरणावळीतून ... ४२
३१) तिन्ही त्रिकाळी ... ४३
३२) आभायानं उघडून दार ... ४४
३३) तेजोमय परिणय ... ४५
३४) उठता सकाळी ... ४६
३५) ही सकाळ पाऊसवेडी ... ४८
३६) नव्या दिसाची ... ४९
३७) रम्य उत्तरे कुणी मांडियले ... ५०
३८) गोदा बहरून येवो ... ५१
३९) पावसाळी ही पहाट ... ५२
४०) सुंदर जगण्या जमवा भट्टी ... ५३
४१) स्वप्नं रोज कांचनाचं ... ५४
४२) हा चांदवा दुष्मन जसा ... ५५
४३) सर्ग निसर्ग हासरा ... ५६
४४) सुगंध दरवळ कस्तुरी शोधणं... ५७
४५) सुन्न मनाची विषण्ण दारे... ५८
४६) आंबा हापूस पाडाचा रसाळ... ५९
४७) एक झाड आयुष्याचं ... ६०
४८) अशी एक सांज ... ६१
४९) सकाळी थोडे ... ६२
५०) धुकाळलेली ही सकाळ... ६३

५१) रात रातीला ... ६४
५२) धरणी आरसा ... ६६
५३) किट्ट अंधार ... ६८
५४) पहाट डुलली ... ६९
५५) शेवटाची ज्योत मी ... ७०
५६) रोज धनवान होतो ... ७१
५७) सायंकाळी उमले सायली... ७२
५८) सोनटक्का ... ७४
५९) निळी सांजुली... ... ७५
६०) माळ दवांची उरते ... ७६
६१) पहाट ओली दवात न्हाली... ७७
६२) हे स्वप्न सत्यात
बस एकदा हो ... ७८
६३) ऊन थोडे पहुडले ... ७९
६४) प्रेम लाभताच स्वर्ग ... ८०
६५) हळव्या रेशीमगाठी ... ८२
६६) लुभविते काजवी
राग यामिनी ... ८३
६७) नंदादीप ... ८४
६८) सोनेरी रंगात ... ८५
६९) कळ्या सकाळी ... ८६
७०) आकाशाने पहाटेला ... ८७
७१) मळे चहाचे ... ८८
७२) तेजोगोलक सूर्य देखणा... ८९
७३) सकाळी सकाळी ... ९०
७४) कसे गोडुले निर्मिले ... ९२
७५) तुझं माझं घरटं ... ९४
७६) असा प्रवास राहो स्मरणी ... ९६
७७) दिस सकाळू सकाळू ... ९७
७८) झरोका ... ९८
७९) एक फुलपाखरू ... ९९
८०) प्राची दिशा ...१००
८१) रोज सकाळी मोहमोहवी...१०१
८२) रेघ एक थांबली ती ...१०२
८३) नवीन वर्ष नवी सकाळ...१०३
८४) रोज सांजेला गगनी चाले ...१०४
८५) क्षण सुंदर जोडून ...१०५
८६) आस मधुरल्या क्षणांची...१०६
८७) अहा ! केवढे रम्य हे दृश्य... १०७
८८) क्षण मंतरले सहवासाचे...१०८
८९) सकाळी सकाळी... ...१०९
९०) सृष्टी सौंदर्याची खाण ...११०
९१) अलगद मिटवून ...१११
९२) त्या अंधारातून जागते ...११२
९३) रास रंगून हसे श्रीरंग ...११३
९४) घ्यावी सोनेरी सकाळ ...११४
९५) क्षण उजळून जाती ...११५
९६) ही उषा रमवून जाते ...११६
९७) सोन सकाळी सकाळी ...११७
९८) सांज मोहरून गेली ...११८
९९) ती सांजवात... ...११९
१००) त्या धुक्यातील
त्या क्षणांना ...१२०




## (१)
## सांज म्हणे वेडी

आज सांज म्हणे वेडी
गोड थंडीत बुडाली
थंडी गुलाबी की बंडी
तिने अंगी पांघरली

बंडखोर थोडी थोडी
अवखळ वेडी लाडी
वेड तिज ऐसे लागे
लागे ऋतूची या गोडी

गोडीगुलाबीने ऐशी
गुलाबात हास
हसली की राधा
श्याम गुलाबीच रास

रास रंगांची उधळे
संध्याराणी गगनात
गगन मगन त्यात होई
रंग त्याच्याही मनात

मनी असती जे रंग
आत खोल दडलेले
दडूनिया प्रेम सारे
सारे आत वाढलेले

रंग पसरला आता
मला सांगणे की सोपे
प्रियेदारी निशिगंध
मन गुलाबाच्या संगे

रात्र तरुणी सुंदरी
जरा सजुनिया आली
वाट पाहण्या आधीच
माझी वाट गंधाळली

रंग असेच राहू दे
थोडे वेडे ते अल्लड
आज स्वर्गीचा वसंत
इथे मला ना उसंत

मन चिंब गुलाबाने
आत रुधिर गुलाबी
प्रिया गुलाबी नि तिची
रिझवणंही गुलाबी

दि. ०४/१२/२०२०
रात्री ०९.०१ वा.



## (२)
## सांज गुलाबी टेकली

निळ्या जांभळ्या क्षितिजाशी
सांज गुलाबी टेकली
नभ राणी सागराला
पाहण्यास की वाकली

तिचा शालू भरजरी
जर चांदण्यांची खडी
पदरास जांभळाई
बिंब सागर हृदयी

त्याचे मनंही गुलाबी
लाटा उसळून येती
प्रेम तरंग नव्याने
त्याची उतावीळ भरती

आज लाडात आलेली
किती रंग ती ल्यालेली
एक रंग उसळतो
सुधा न्यारी की प्यालेली

अशा सांजमीलनाला
चंद्र साक्ष देत राही
लाज गुलाबी वाढवी
तो की प्रेमदूत होई

मावळतीच्या सूर्याने
मंद प्रकाश केला हा
अशा लाघवी प्रीतीच्या
किती वेल्हाळ वेळा ह्या

सय दिसभर तिची
नभांगना कामामध्ये
जरा फुरसत आली
रत्नाकर जोमामध्ये

तिचे नितळ ते बिंब
याच्या अंगाखांद्यावर
दोघे भेटले मिठीत
कसनुस बांधावर

क्षितीजाच्या मनी फुले
मीलनाची गोड बात
डोळे मिटून घेताच
नभसागर भरात

दि. ०८/१२/२०२०



## (३)
## रम्य ही सकाळ

रम्य ही सकाळ,
शांतीचा सुकाळ
केशराचे झाड उभे,
वसंतास बळ

झाडाईच्या रांगेमध्ये,
सरलता छान
हिरव्या हिरव्या गवतावर,
खुलते की पान

गळलेली पानं वेडी,
वाट पाहताती
पुन्हा झाडावरी जाऊ,
की जाऊ कुणा हाती

निळ्याशार गगनात
केशराचे बिंब
केशरिया पानांनी
हा वृक्ष रंगचिंब

पिवळ्या पिवळ्या पानांचा
हा डवरून आला
अन्य एक वृक्ष
रंगी भाळूनिया गेला

अशी ही सकाळ
सांगा अंगणात आली
रुणझुण पैंजणाने
रेंगाळून गेली

दि. २७/११/२०२०
सकाळी १०.३० वा.




## (४)
## वाट लाजली लाजली

वाट लाजली लाजली
कशी गोरीमोरी झाली
आज राजसाने तिला
पहाटेच चुंबीयेली

सोन शालू दिला तिला
तिचे लावण्य खुलले
रान गुपचूप वेडे
डोळे मिटून बसले

झाडं वेलींच्या आडून
प्रीतवल्ली त्यांची चाले
कसा वाकून झोकून
प्रियतमेला न्याहाळे

तो तो लपवते तीही
अंग चोरून लावण्या
त्याचे किरणांचे कर
तिच्या भोवती विळखा

कशी शहारली बघा
वाट नागमोडी झाली
सळसळ की पानांची
कानी हळुवार आली

सावरते ती अंचल
प्रियतम तो चंचल
त्याच्या रंगात बुडून
क्षणी तीही अविचल

दिसभर हेच चाले
साऱ्या दिशांनी तो पाही
तिजवरती प्रेमाचा
तेजवर्षाव तो करी

येता सांज मावळती
दोघे काळवंडलेले
विरहाचे क्षण नको
रोज निशेसी भांडलेले

जातो कर्तव्य वहाण्या
वाटेकडे त्याचे डोळे
वाट पाहते वाटंही
विरहाचे घोट काळे

होता पहाट सोनेरी
रंग तिचा उजळतो
प्रियतम सखा सूर्य
तेज कोवळे आणतो

झाडे आनंदात सारी
गीत मीलनाचे गाती
पालवीची सळसळ
पक्षी सप्तसुर देती

दिस घालवतो तोही
वाट त्यालाच सांभाळी
किरणांनी लाजलेली
गोड वाट ही सकाळी
रोज दिसते सकाळी

दि. ०७/१२/२०२०
सकाळी ९.२७ वा.



## (५)
## का पुन्हा हुरहूर

आज पुन्हा सांजेला बघ
का पुन्हा तीच हुरहूर
कित्ती विचार, गुंता नुसता
अनुत्तरित प्रश्नांचे काहुर

सारं काही देऊन सुद्धा
कुणी आपलं होतंच नाही
मनातून कधी कुणी
काही केल्या जातंच नाही

ज्याच्यासाठी जीव द्यावा
तो निष्ठुर इतका की
असा कसा कोणी राहू
शकतो नुसता कोरडा की

भावनांची नदी वाहते
काठावरती वाट पाहते
ओंजळभर गोडवा चाखंत
ती मनात कायम राहते

कळणाऱ्याला कळेल का
तप तिचे फळेल का
ओबडधोबड रस्ता असा
एक वळण वळेल का

दि. १२/१२/२०२०
रात्री ०८.३१ वा.



## (६)
## पहाट फुटली अंधाराला

पहाट फुटली अंधाराला
खबर न त्याची झाली
स्वप्नामध्ये गढली निशा मग
उषेस झेलून गेली

दिले आळोखे किती पिळोखे
पडदे डोळ्यावरती
रातराणीचे स्वप्नं चालले
प्रणय तिला तिज स्मरती

परी पहाटे किरणे लेऊन
ताजी कोमल हळवी
सूर्य करी मग पाठलाग हा
उषा सोनेरी हळदी

चंद्र निशेच्या कुशीत दडला
उषा उगवली हलके
मागे मागे अवखळ राजस
किरण नयन बोलके

अंधाराचा घेत फायदा
लपून जाते उषा
पसरवीत हे तेज प्रेमाचे
उजळून टाकी दिशा

एक मावळे एक उगवते
आकाशी तनुवरती
प्रेम विलासा पाहता खळीही
खुलते गालावरती

निसर्ग करतो प्रेम तेवढेच
कमी न कधीही होते
माणूस उबगून जातो परी हा
प्रीत इतिश्री होते

रोज तेवढेच रंग पसरणे
प्रेयसीसवे विश्व विसरणे
या प्रेमाला कमीच नाही
रोज तेवढे बहरून येणे

वाट पाहते एक सांजेची
एक पहाटे उमलून येते
प्रेम नशिबी दोघींच्याही
दिवारातीला फळून येते

दि. १३/१२/२०२०
सकाळी ०८.१९ वा.



## (७)
## मी रानवाट ही गावठी

मी रानवाट ही गावठी
तू गावशील का रं मला
सिंगार काट्या अन कुट्याचा
पावशील का रं मला

हे रान माझ्या संगती
त्याच्याच साठी धावतो
ह्यो ह्यो किसान बी रोजचा
तुडवंत मला की चालतो

म्या बी कधी ना कोपले
त्यो पोसतो समद्या जगा
कोण बी ना वाली त्याला
रागवू म्या का उगा

त्याच्या शेतातलं सारं
तन माझ्या अंगावर
काट्याकुट्यांची झुडपं
विसावती काठावर

म्या अशी नटूनथटून
वाट पाहते रं तुझी
ये सकाळी सावकाश
सांजच्याला बी कधी

दिसभरी तू कामामंदी
गढून जातोयास की
समद्याला देतोस तेज
ऊब बी पिरतीची ही

थांब थोडा एकटी मी
एकटीने न्हाईली
जो कुणी आला तो गेला
टाकुनी पुढं पाऊली

ना कुणी थांबून पाही
काय मनी माझ्या हितं
सुर्व्या राजा सांगू कसं म्या
नाठाळलेली गोड गुपितं

प्रीत तुझी माझ्याशी जोडी
रेंगाळतो तू माझ्या साठी
म्या उरी खुलतीया येडी
किरणांची त्या मजला गोडी

रागावून तू भर दुपारी
लालसर होतो किती
मग जरा म्या सांगते ना
सांजच्याला ये माघारी

राग त्यो लई भारी बाबा
म्या कसं घेऊ कुशीत
शांत हो तू सांजला अन
पहाटंला बी ये खुशीत

झाडं मिचमिचं डोळं करुनी
बघत्याती गुपचूप जरा
अन तरारुन येती गवतं
अंगावर माझ्या शहारा

सोन्या सुर्व्या तू गुणाचा
हाय ना माझा धनी
वाट ही वाटंला डोळं
तूच तू माझ्या मनी
तूच तू माझ्या मनी

दि. २४/१२/२०२०
सकाळी १०.२१ वा.



## (८)
## **सूर्य उगवता**

सूर्य उगवता सोने पसरे
मधे उभा नग जात
असे दर्शनाची आस आणिक
छेद तयाच्या आत

तेजपती श्रीनारायणाचे
रुपडे किती मधु बरवे
पण डोंगर हा मधेच आडवा
देहासी पसरवे

आस भेटीची असे केवढी
खडका खोदीयले
व्यत्यय मोडून काढून मग ते
प्रस्तर भेदीयले

असेल ध्येयासाठी मनी ही
जिद्द भावना मोठी
किती संकटे उभी ठाकू दे
अगदी डोंगराएव्हढी

त्यातून मार्गा बनवीत जावे
ध्येय प्रविष्ट की होईल
सोनसोनेरी आशाकिरणे
सूर्य हाताशी येईल

उभे असू दे किती अडथळे
मर्मी घाव बसावा
तेजकिरण मिळविल्या विना ना
जिवास मिळू दे विसावा

असा भेटता मार्ग सोनेरी
कष्ट फळाला येती
नित्य नव्याने संधीपहाट या
किरणे उधळून जाती

दि. १४/१२/२०२०
सकाळी ०८.५४ वा.



## (९)
## हे प्रेम ते न सखया

हे प्रेम ते न सखया
स्पर्शतुनी फुलावे
हे आत खोल खोल
मनोभूमीतुनी रुजावे

ही वाट पाहणे नि
ऐसी प्रतीक्षा आहे
जेथे तो काळ वेडा
वेडावलाच आहे

हे प्रेम देणेघेणे
ठरले असावे स्वर्गी
दैवी कृपाच दोघा
घेऊन जवळ आली

मी जागवीन रात्री
हा चंद्रही नभात
तो पाहतो न प्रीत
होण्या सखा सुखात

हे प्रेम शब्द काया
त्यांच्याही पैलतीरी
डोळ्यात स्वप्न माझे
सुरभित ऐलतीरी

ही प्रेमधारा वाहे
नित नित्य जीवनात
मी मांडते सुखांना
घर देत या मनात

घेईन तुजसी जवळी
कोण्या अशाच वेळी
ती रात्र धुंद होता
गात्रात चांदणेली

दि. २४/०१/२१
रात्री १२.४२ वा.



## (१०)
## भेट ठरू दे भावमल्मली

जन्म पुरावा कसा सखे गं
अजरामर ती भेट आपुली
रोज वाट मी पाहत असतो
पाहत राहीन साक्ष अबोली

रोज निशी या चमचम चमकत
दमकत येती नभी चांदण्या
तुझ्या आठवांनी मी गुंगून
अंगी झेलतो शीत चांदण्या

असा मी असतो उभा मार्गी अन
वाट तुला मजजवळी आणील
त्या वाटेवर सडा सुगंधी
प्राजक्ताचा शिंपून जाईल

सारे सारे घडते तैसे
जसे ठरवितो मीही आतून
तुझ्या आगमन उत्सुक साऱ्या
शुभ्र चांदण्या तनमन पसरून

आता शिणले डोळे माझे
त्याही गेल्या बघ कोमेजून
सरली सारी रात्र विरहिणी
विरही तारका गे मंदावून

कधी तू येशील राणी जवळी
भेट ठरू दे भावमल्मली
मंद न होवो प्रीतचांदणे
फुलून येऊ दे वनी शाल्मली

दि. २६/०३/२१
रात्री ११.११ वा.



## (११)
## अशी कांती तेजाळली

गेला बुडून डुबून
सायंकाळच्या प्रहरी
क्षितिजाशी रेंगाळली
केशराची छटा न्यारी

जाता जातानाही देतो
रविराज दृष्टिसुख
वर निशापती आला
भागे चांदण्याची भूक

एक तेज तळपते
एक आल्हाद लेऊन
दिन प्रकाशित करी
एक रात जागवून

एक येतो उठवत
एक झोपण्यास सांगे
दोघे चालवती रथ
सृष्टी रंगातून दंगे

एक मावळतो तरी
मनी उगवत राही
एक उगवतो जरी
शीण जाय मावळती

नभी सौभाग्याचा टिळा
केशराचा गंधमळा
निशी सजून धजून
चांद रुपेरी बावळा

जीव त्याच्यातंही आहे
जीव याच्याही भवती
जिथं तेज शीतलता
थोडं थांबू की सांगाती

राहे आदित्य हृदयी
चंद्र मनातून वाहे
एक दिवसाचे स्वप्नं
एक रातीस रमवे

अशी कांती तेजाळली
दिशा कशी उजळली
औक्षवण करते ही
तेज किरण अवळी

दि. २५/०४/२१
रात्री ०८.०३ वा.



**(१२)**

**होत काजवा जीवनी**

रानावनात पेटलं
लख्ख काजव्यांचं दिवं
माझं सपान सजलं
लुकलूक ते पहावं

रान झालं की जीवन
राती भयाण अंधार
आस गडद काळोखी
तेज चमकतं फार

सुर्व्या दिसाचा सोबती
काय अमावस राती
चांदवा ह्यो तवा गुल
कुठं चांदण्या बी जाती

कुट्ट काळ्या अंधारात
कित्ती भयाण ही भीती
काहिबाही मनी येता
उरी धडधड व्हती

उडं थवा काजव्यांचा
टिमटिमत्या पणत्या
इवला इवलासा जीव
तेजशलाका कोणत्या

कित्ती आधार वाटतो
काजव्यांचा तुम्हा सांगू
ऱ्हाय एकली रानात
भीती झाडावर टांगू

जवा होतोया अंधार
काळाकुट्ट भवताली
सजना रं तुझ्यासाठी
म्या... काजव्यांची साडी ल्याली

तुझ्या नशिबाला म्या ही
देत राहीन उजेड
होत काजवा जीवनी
तुझ्या काळज्या बिमोड

दि. १२/०४/२१
दुपारी १२.२३ वा.



## (१३)
## आज नभी लाजली ही उषा

आलास प्रिया तू असा जीवनी
सुखस्वप्नांचे पंख घेऊनी
पाऊल नसते अवनीवर मज
उंच भराऱ्या माझ्या गगनी

आनंदाने विहरे आणिक
वाऱ्यावरती लहरे मी
एक अनामिक दैव संगती
आपुल्या हाती पाहते रे मी

एक सुखाची ग्लानी मजला
बुडून जाते तुझ्यात मी
मी झोपले की जागी असते
गढून गेले तुझ्यात मी

काय होते मज असे नेमके
शब्दच नाहीत प्रिया सांगण्या
आकाशातून उडताना मज
ये ना सख्या तूही सोबत उडण्या

हा आनंद ही नवीन आशा
आपुल्या प्रीतीची नव परिभाषा
तू मी, मी तू एकरूप अन
आज नभी लाजली ही उषा

दि. ०९/०४/२१
सकाळी ०८.१७ वा.



## (१४)
## अशी सफर बघ आयुष्याची

उंच उंच नभी तुझ्यासवे मी
उडले मनमोकळी
फूल जाहले आणि जीवाचे
खुलली पाकळी पाकळी

ते बंदिस्त जीवन माझे
गर्त दुःखाची होती
एक सकाळ अशी उगवली
उडून गेली भीती

तू आलास नि पंख दिले मज
उंच भरारी घेण्या
सोबत होता तूच राजसा
हात हाती सांभाळण्या

अथांग नभ ते अथांग सागर
पर्वतराजी सुंदर
धुके बोलके क्षण पळणारे
वनराजी अपरंपर

उत्साहाचे पडती धबधबे
नदी वाहते रे सुसाट
वारा गाली गुज सांगतो
प्रीत विहंग अचाट

मी कुशीत आकाशाच्या
धरती आली आली कवेत
ऊनसावल्या निळी निळाई
हिरवाई आवेश

अनंत इच्छा पक्षी थवे हे
उडती स्वच्छंदाने
हात हाती तुज देता झुलले
जीवन आनंदाने

अशी सफर बघ आयुष्याची
घडवून गेला राजा
दूर क्षणी ते मळभ कधीचे
सुगंध ताजा ताजा

दि. ०७/०५/२१
सकाळी १०.२३ वा.



एरवी जे खोड्या करती
ते नयन झुकले बळे
बंद डोळ्यातून मजला
दिसती स्वप्नं सोहळे

तव भ्रूकुटी लीला करुनी
करती मज घायाळ ज्या
आज अगदी शांत चित्री
रेखाव्या असती अशा

## (१५)
## बाहुपाशी ये जराशी

बाहुपाशी ये जराशी
घट्ट बिलगून जा मला
चांदणीला कवेत घेऊन
चंद्र होऊ दे मला

अंग चोरून लाजलाजून
झाली तनु नाजूक कळी
वाटते जणू जाईजुईला
घेतले मी ओंजळी

घातला वेढा करांनी
तूच तुझिया भोवती
कोंदणी त्या ठेव ठेवीशी
लज्जा शीला राखशी

ओष्ठ दोन्ही बोलके जे
बंद थरथरती उगा
अमृताचे पान करण्या
आतुर मी गे केवढा

ती हनु गोल सुंदरी
केवढी झुकली खाली
या करांनी उचलुनी तिज
चरम सुख मज शृंगारी

शब्देविण रस बोलती
आनंदभाषा सुंदरी
ही मिठी ही रात्र पूनम
राहू दे सदा अंतरी

दि. २९/०४/२१
रात्री ११.४८ वा.



## (१६)
## चंद्राआडचं आभाळ

चंद्राआडचं आभाळ व्हायला
मन मोठं लागतं रे
चंद्र झेलून मागे राहणं
सांग कुणाला जमतं रे

स्तुती झाली तर होईल शशीची
आभाळ रिक्त असेच ना
तेजाला त्याच्या सांभाळूनही
आभाळ अंधार लेतेच ना

चंद्र आला की गोळा चांदण्या
एरवी कोणी फिरके ना
काळ ढकलावा म्हटलं तरीही
कृष्णपक्ष हा सरके ना

ती भयानक रात्र काळोखी
अमावस्याही परकी ना
आभाळाला दोन्ही सारख्या
पूनम अथवा अमावस्या

ते एकाकी जगणे अवघड
एकटेच ढग पोसणे ना
चंद्र तारे पाऊस इंद्रधनू
सगळे इतरांस्तव असणे ना

हसले तर ते पडे चांदणे
काळोखाने कृष्ण निळा
गप्प बसे तर घुम्म आभाळ नि
गर्जत असता घन बावळा

स्वच्छ दिसे तर पिंजला कापूस
गरजे तर मग बरसेल काय
पाऊस पाडून पाहतो तेव्हा
श्रेय मृगाला वर्षी जाय

चंद्राआडचं आभाळ होणं
आधार केवळ बनून ऱ्हाय
कधी ना नशिबी कौतुक येईल
खापर फुटलं जाईल पहाय

चंद्राआडचं आभाळ हसरं
दुःख कुणाला समजे ना
असून नसून कुणी ना आपुले
जखम कुणाला उमजे ना

चंद्राआडचं आभाळ होणं
धुमसून गुपचूप रडणं फार
सुखास थारा नाही कधीही
दुःख बोचरे, अति धारधार

दि. २९/०४/२१
सायं. ०५.२१ वा.



## (१७)
## रंग लेऊन सर्गाचे

एक रम्य ही पहाट
सुर्व्या बगा उगवला
रंग लेऊन सर्गाचे
चित्त जागवण्या आला

पक्षी किलबिलती
झेप घेत आकाशी
झाड डोले आनंदाने
रेखी एक रम्य नक्षी

एक रंग दुजामध्ये
मिसळतो असा काही
माझ्या देवाच्या कलेला
कुटं कुटं तोड नाही

आदित्य देवा रोज
हात जोडते नमून
चैतन्यचं सांडतो हा
न चुकता येऊन

राती डोळा लागे डोळा
प्राण होती कुटं गोळा
न्हाई शुद्ध तवा कोणा
रोज नभी ये पाहुणा

कधी कार्याला ना चुके
सारे तेजापुढं फिके
ब्रह्मांडातुन फिरता
नाही होत कधी रिता

रोज दिसतो म्हणून
जिती जागती माणसं
त्यो नसलं तर हो
सांगा ओसाड रानंच

अशी सुंदर पहाट
देवा बघावी की सदा
माझ्या घरा दाराला रे
देई आशीस समदा

आणि काय मागू तुला
देवा सुर्व्या तू तेजाळ
कष्ट करुन जगावं
नगं मोहाचं हे जाळं

मला एकंच कळतं
तुझ्या वानी मी वागावं
देत परकाश साऱ्या
दिवा होऊन जगावं

७/१२/२०२३,
१३:५७



## (१८)
## अन संध्येचा स्वर गहिवरला

मी गाताना गीत विरहिणी
उभी एकटी नदीकिनारी
प्रवाह कंपे मग भिरभिरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

सागर वाटे होईल साथी
परी तयाच्या काही न हाती
खारट पाणी आसवे भरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

मार्ग चालले अशी एकटी
संघर्षाची संगे दिवटी
नियती अबोल नादही विरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

कधी ना लाभले सुख आठव ना
व्यर्थ मनाला वनी पाठव ना
वणवा जळजळ पेटून उठला
अन संध्येचा स्वर गहिवरला

शोभा झाली दिन जगण्याची
कलले यौवन रीत जगाची
हात आशेचा मग थरथरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

जगण्याची मज पाहून धडपड
रात वेध घेताना सरसर
मिटून घेण्या काळ देखला
अन संध्येचा स्वर गहिवरला

काळा कभिन्न यमही हलला
कवितेच्या मज प्रेमी पडला
शब्द नव्हे हे व्यथा रंगल्या
अन संध्येचा स्वर गहिवरला

कसे नेऊ मग निजसदनाला
शब्द देह हिज आत्मा शब्दचि
हळवा होऊन यमही वदला
अन संध्येचा स्वर गहिवरला

जगणे मरमर मरणे सुंदर
नव्या युगाची मीच युगंधर
हास्य सजविले मुखमखराला
अन संध्येचा स्वर गहिवरला

मीच म्हणाले संध्याराणी
नको आणू तू नयनी पाणी
तूच एकली सखी धाकली
वेदनी शालू बघ जरतरला

अन संध्येचा स्वर गहिवरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

दि. १५/०७/२१
दुपारी १२.४७ वा.



## (१९)
## सकाळराणीचा सोहळा

कुठे गेली ती सकाळ
आता दिसतंच नाही
देवपूजेसाठी फुलं
घ्यायला कोणी नाही

आधी असे सोहळा
सकाळराणीचा
पहाटेच्या गोड क्षणी
झोप सोडण्याचा

उठताच आधी
देवघरापुढे उभा
राहूनिया नजरेने
देव पाहण्याला

सारं काही त्याच्या
कृपेमुळे आज आहे
अशीच कृपा राहो
हे त्याला सांगण्याला

घरादाराची झाडून
स्वच्छता होई
दारापुढे सडा रांगोळी
सजून जाई

श्लोक उच्चारणा सवे
मंगल ते स्नान
साऱ्या नद्या होत गोळा
होता आवाहन

स्नानातून येई शुद्ध
पावित्र्याचा वास
केस धुतल्या आईचा
पसरे सुवास

छान साडी नेसून ती
अंगणात जाई
हातातल्या परडीत
फुलं गोळा होई

जाई जुई प्राजक्त नि
बकुळ सावळा
सदाफुली मोगरा नि
गुलाब पिवळा

तुळशीची मंजिरी
गोपालकृष्णासाठी
गंधभरा मरवा नि
आंब्याची ही फाटी

झाडावेळींजवळ ती
जाता हळुवार
आपसुक देती फुलं
त्याही अलवार

मग आई पूजेसाठी
अंगणात जाई
संस्कृती घराची पूजे
तुळशी ही माई

प्रदक्षिणा घालताना
वर मागतसे
सारे तिचे पावित्र्य
जीवनी आणतसे

मग होते घरामध्ये
देवपूजा मोठी
स्तोत्र, मंत्र, नैवेद्य नि
धूप, पंचारती

सारेजण आरतीला
सोबत जमती
घर सारे देवांच्या
सेवेला दिमती

मग आनंदाने सारे
प्रसाद भक्षिती
कुळपरंपरा
मिळूनिया रक्षताती

तळहाती तीर्थ येता
भक्तिभाव जागा
मनातल्या मनात
साऱ्यांसाठी सुख मागा

कुठे गेली सकाळ ही
शोधून थकले
परक्यांच्या मागे जाता
भारतीयत्व विकले
भारतीयत्व विकले

दि. २९/६/१९
सायं. ७.१५



## (२०)
## नीलसागरी नौका

दिनकर नीलांगणी प्रभाती
नीलसागरी नौका
पाण्यावरती बिंब चकाके
त्यात हवेचा झोका

नीलमण्यांवर सुवर्णकण
हलकेच तरंगत येती
लाटांवरती सोनसळी
चांदण्या विहरत जाती

पाण्यावरती दिवे तरंगती
सूर्याने लावलेले
नीलवर्ण जलांगणी बघ
दीप असे तेवलेले

स्वर्गाचा दीप्तीमान खंड
आकाशातून पहातो
नभसागर अन सूर्यतेजाचा
मेळ अनोखा होतो

अशा क्षणाला नौकेमधून
बसून शांत तरावे
पंख लेऊनी आकांक्षेचे
खग होऊन विहरावे

सौंदर्याच्या सर्व कल्पना
इथे फिक्या पडती
नवपरिभाषा अर्था येऊन
लावण्ये झडती

तेजोगोलक सूर्य देखणा
आकाशाचा राणा
कांती प्रभेच्या लाटा उठती
त्यावर आरूढ व्हा ना

दि. २९/७/१९
सायं. ५.५२ वा.



## (२१)
## सकाळी मोगऱ्याच्या

कळ्या सकाळी मोगऱ्याच्या
येऊन बसती थाळी
कधी न सुकती गंध पसरती
अंगणी रानोमाळी

आठवणींचा गुच्छ न त्याचा
गजराच विणावा लागे
स्नेहधाग्याने ओवून त्याला
अवलीत बांधावे लागे

दोन मोगरे देठ जोडले
दिशा दोन बहरल्या
सुई टोचली तरी ना कळली
वेड्या मोगऱ्याला

दिसते त्याला तिच्या जवळचे
केशकुंतली रमणे
अन रमणाच्या हातून तेथे
माळून स्वतःस घेणे

तिच्या अंगच्या गंधकळ्यांना
हुंगून टिपून घेणे
सुवास भरता तनामनातून
स्मृतिकोश मोगरा होणे

केशकलापी गप्पा रंगती
कुंतल, मोगऱ्याच्या
केश सांगती भावकथा
बघ तिच्या रोमरोमीच्या

एक गजरा तिने दडविला
आपुल्या उदरात
सुगन्ध देईल तिला सारखा
राहील तो भरात

असा मोगरा होऊन गजरा
तिच्या वेलीवरती
फुले उमलती गूढ सांगती
आयुष्या भरती

दि. २९/७/१९
रात्री ८.१७ वा.



## (२२)
## कोवळी सकाळ

हिमगौर पर्वताने
पांघरून नीलवस्त्र
नभ निलायम वरती
निलकांती ही सर्वोत्तम

हा खंड चित्राचा काही
अथवा हे शिल्प अतुल्य
शीतलता अंगावरती
सौंदर्य असे हे अमूल्य

या निळ्या पांढऱ्या छटांनी
कोवळी सकाळ पाहताना
तो सूर्यही अडखळतो ना
वसन उषेचे विणताना

हे उंचवटे पृथ्वीचे
की नजरसुखाचे भाग्य
रजत निळाई तिजला
बहाल करती सौभाग्य

मी कुठे मनाला ठेवू
की वर गगनाला पाहू
अथवा नभांगणातून
सुंदरता साठवून घेऊ

शब्दही पडती अपुरे
ही सुरेख सुरगोपुरे
वर्णिण्या प्रतिभा कोठे
कुंठित सामर्थ्ये सारे

दि. ३/१२/१९
६.४१ वा. सकाळी



## (२३)
## सकाळी सकाळी

सकाळी सकाळी
फुलली अबोली
रंग निराळी अन
नाजूक ती पाकळी

आकार ऐसा
असे वेगळा की
एका फुलाचे
विभाजन जणू ती

नसे रंग जैसा
तिचा मोहणारा
सोशीक वेडा
स्वभाव साहणारा

कुणी नाव दिधले
अबोली तियेला
सांगून जाते
व्यथा रोजचीला

न बोलून काही
जरी दाखवे मी
हळव्या मनाला
मन कळते तरीही

गजरा हा माझा
दिसे वेगळा की
केसात माळून
प्रीऽऽत कबुली

अबोली फुलावी
अशी अंगणी की
बोलून जावी
मनी बोचणी जी

काटेरी कणसात
कळ्या कोवळ्या ज्या
दूर दुःखास सारून
उमलून याव्या

हळव्या मनीच्या
हळव्या कथा या
रंगात आपुल्या
अबोली रहाव्या

हसरी अबोली
दुखरी अबोली
जखमा असो वा
सोसरी अबोली

दि. १८/११/१९
सकाळी ६.१५ वा.



## (२४)
## काल तिन्ही सांजेला

गवतफुलांशी बोलून आले
काल तिन्ही सांजेला
डोलून, डवरून सांगून गेले
गुज मनीचे मजला

रोज सकाळी उन्हात भिजूनी
शक्ती नवी घेता
दिसभर चैतन्याशी आम्ही
सदोदित खेळता

कधी ही आमुची रानफुले
तर कधी तुरे उगवती
उन्हं, सरी पावसाळी आणिक
शिरशिरी थंडी घेती

दिसभर सूर्य जसाही फिरतो
त्या उन्हासवे उजळतो
वाऱ्यासंगे डोलून डोलून
रानाशी बोलतो

कधी उन्हाशी लपाछपी
तर कधी वाऱ्याशी गप्पा
कधी देतो मग इवल्या फुलाला
हळूवारसा धप्पा

असे कितीसे वेगवेगळे
खेळ आम्ही मांडतो
ना रुसतो ना फुगतो
आम्ही नाही कधी भांडतो

गवतपाती ही आमुची आई
‘खाऊ’ आम्हाला देते
तिच्या अंगावर हुंदडतो, ती
मस्ती साहून घेते

सायंकाळी तिच्या कुशीतच
अलगद पहुडताना
स्वप्नातही ती थोपटते
गीत अंगाई गातांना

आम्हीही जगतो क्षणाक्षणाला
चिंता उद्याची नाही
जगणे दुसरे काहीच नसते
क्षणास फुलवत जाई

गवतफुलांचे गूज जाणुनी
मीही नव्याने शिकले
चिंता काळज्या सोडून देऊन
गवतफुलांचे ऐकले

आता मी सारे ऋतू पाहते
सेवा मज करताना
सृष्टी सारी सुखसोहळे
माझ्याचसाठी भरताना

दिलखुलास माझे हसणे, बसणे
आणिक जगणे आता
मी हलके हलके गवतफुलासम
होऊन जगणे आता

दि. २४/११/१९
सकाळी ०८.११ वा.



## (२५)
## प्रसन्न वेळी

ही रंगवल्ली की
म्हणा रांगोळी
भावमनीच्या ओळी
गृहिणी लिहिते सकाळी

बिंदू बिंदू जोडून घेते
नाती अशीच सांधुनी
दूर दूर ते असले तरीही
रेखा एक जोडोनी

चित्र मनीचे धरणीवरती
सारवलेल्या सुगंधपटली
गेरूने कधी फरशीवरती
रंग विटकरी पसरून घेती

साऱ्या साऱ्या रंगसंगती
रांगोळीतून किती बोलती
संसाराच्या सुरेख चित्रा
दारी रांगोळी सांगत बसती

ती मनात आधी रेखून घेते
सुखक्षणांचे आखून नाते
रांगोळीतून आलेखाने
संसाराचे सुख सांगते

कधी फुलांची कधी पानांची
कधी धान्याची होई रांगोळी
जे जे हाती असेल त्यातून
कुंकू रेखिते धरणीभाळी

सडा रांगोळी बोले संस्कृती
आंगण सांगे घराची कृती
देवीदेवता सज्जन सारे
थबकून पाहती थाट जरा रे

फुले फुलांना घेत सोबती
ठेवील गृहिणी तसे राहती
आकारातून ताज्यातवाण्या
मोहक गंधा उधळत राहती

प्रसन्न वेळी, अशा सकाळी
गृहलक्ष्मीची कला रांगोळी
कलावतीच्या हातून येथे
भाग्य उमटते उजळमाथी

खरे सांगू का, ती प्रकट होते
घरादाराला आनंद देते
नजरेमधुनी गृहलक्ष्मीच्या
हस्तकलेला सलाम करते

दि. १०/१०/१९
दुपारी ३.४५ वा.



## (२६)
## सोनसकाळ आलिया

उन्हं पांघरून रान
पुन्हा नवं की झालंया
सोनसकाळ आलिया
मन सोनेरी झालंया

कवडसा आधी आला
आली उषा त्याच्यामागं
तिनं पायघोळ झगा
नेसला की झगमग

रातीचा त्यो अंधार
झाला गुडूप कवाच
एक आशा संगतीनं
तिनं आणली मनात

झटकून आळसाला
रान लागलं कामाला
वनचरे निघाले की
घास गोड शोधण्याला

पान पान जागं झालं
सळसळून डुललं
वेली राण्या झाडासंगं
संसारी फूल आलं

झोपलेलं रान व्हतं
किर्रर्र किड्यांच्या सुरात
आता सुर्व्या बघून
पक्षी गायन भरात

एक चैतन्याची लाट
आली तनात मनात
दूरवर नारायण
तरी रोज अंतरात

दि. १०/१०/१९
सकाळी ११.३० वा.



## (२७)
## भल्या पहाटे प्राचीला

कांचन पिवळ्या उन्हात न्हाऊन
फुले डोलली ऐशी
रंग अनोखे सुरेख तनुवर
रंगकर्मी पाहशी

पिवळ्या उन्हाना खेळवीत बघ
अंगाखांद्यावर
पक्षी गोडूला धमक पिवळा
बसला फांदीवर

ही सुंदरता पिवळ्या रंगा
सृष्टीमध्ये अवतरते
सोनपिवळा हा स्पर्श कोवळा
प्रसन्नतेचे ये भरते

रोज सकाळी सोने वितरित
करूनी सूर्य हा तेजस्वी
मीही या रंगास पांघरून
सकला भासतो ओजस्वी

या रंगाचे पडे चांदणे
भल्या पहाटे प्राचीला
चालून घ्यावे आरोग्याचे
सोने लुटुनी प्रभातीला

कांती पिवळी वधू हळदते
पितांबर नेसुनी अशी
सौभाग्याचे आरोग्याचे
दान मागते देवाशी

हळद लागते अंगाला अन
मनास सोने उलगडते
नव्या वाटेवर पिवळे पिवळे
स्वप्न सोनेरी तिज पडते

पीत सोवळे नेसून देवा
तूही पितांबरधारी
देवगुरु प्रिय रंग हा पिवळा
बृहस्पतींच्या मंदिरी

निसर्ग जन्मा घालीत राहील
वेगवेगळी रत्ने अमाप
पुष्कराज हा प्रसाद गुरूचा
पिवळ्या रंगाचाच अगाध

रंग हा पिवळा मनात बसला
जिकडे तिकडे सोने हे
या रंगातून वाट काढूनि
खंडेराय दारी जाणे हे

दि. ३/१२/१९
सकाळी ८.३७ वा.



## (२८)
## रोज प्रभाती सृष्टीने

आकाशाने भाळावरती
केशरी टिळा रेखिला
रोज प्रभाती सृष्टीने
अध्यात्म उदय देखिला

अजून कोवळा सूर्यबाळ हा
रंग गोजिरा लेऊन
अष्टगंध जणू उधळीत चाले
रक्तचंदने घेऊन

ब्रह्मचर्य हा पाळत असतो
संन्याशाची छटा
दिनमणी तेजप्रकाश घेऊनी
कांती देत एकटा

तहानलेला बाळरवी हा
अर्घ्य प्राशितो अवघे
चंडप्रचंड ऊर्जेने ती
लाही काहिली होई गे

नजरेमधुनी साठवून त्या
देखदेखण्या बिंबा
एक तेज उदयते अंतरी
चैतन्याची गंगा

रोज पहाटे भेटून त्याला
नमन करावे नित्य
प्रकाशमय तो करतो जीवन
स्वागत व्हावे अगत्य

एक सूर्य बघ होता येईल
जिथे दाटली निशा
तळपत राहू पसरीत तेजा
मनी आशेची उषा

दि. ४/१२/१९
सकाळी ६.२९ वा.



## (२९)
## एक अनोखे मंथन

रोज सकाळी एक सोनेरी
लाट मनी उसळते
सूर्य उगवता चैतन्याचे
रस सृष्टी घुसळते

एक अनोखे मंथन होऊन
देहाला प्रेरणा
नवविचारांच्या नवनीते
शतघृत मिळते मना

आयुष्याला कारण बनते
अमृत प्रभातसमयी
आरोग्याच्या मंत्रामधुनी
उजळते जीवनसमई

सूर्य देखणा पूर्वेला बघ
अद्‌भुत रंगविलासी
किती तमाची मरगळ संचित
नेतो तो विलयासी

नभांगणातून पक्षी गाती
भाट बनून तव स्तुती
दिनकर राजा उदया येता
ब्रह्मांडाला गती

देवांची तू दृष्टी असशी
तेज तुझे मम नयनी
अर्ध्य तुला मी देतो प्रभाती
तेज भरू दे जीवनी

तू तेजाचा गोलक देवा
ऊर्जेचा मार्तंड
तुझ्या कृपेने सृष्टी जीवित
स्रोत असा तू प्रचंड

आत्मकारक बनूनी तू तर
कीर्तीदाताही होशी
अज्ञानाच्या तमास गाढुन
ज्ञानसूर्य बघ ठरशी

तुझा एक होईन कवडसा
उजेड घेऊन हाती
प्रकाश देण्या तुझा वारसा
तेजाची आरती

दि. ८/१२/१९
सकाळी ५.५१ वा.




## (३०)
## किरणावळीतून

भुई झाकली हरिततृणाने
पोपटी हिरवा रेशीम शालू
स्पर्श तयाचा इतुका मऊसर
गोरीमोरी धरा लाजाळू

तिने ओढला वृक्षराजीचा
घनदाटी हा पदर मुखावर
तरीही लाडिक राजस तिजला
त्यातून वाकून पाहतो दिनकर

दृष्ट न लागो माझीच तुजला
इतुकी दिसशी गोड मोहिनी
मीही ऊब ही देत प्रेमाची
संयम राखीत येतो जवळी

उन्ह कोवळी अंगावरती
फिरतील राणी, तू रोमांचित
फुले शहारा मज अंगावर
मीही सदैव तुजला अंकित

रोज सकाळी प्रणय सांगतो
मी तुजला बघ अनुनयातून
तुझ्या पाठी मी चालत राहीन
उजळीत तुजला किरणावळीतून

थांब सखे मज जाणून घे ना
तुझे सारखे संकोच हे ना
कसा किती मी अधीर राणी
तरीही मर्जी तव ओलांडीन ना

रोज तुझ्यावर प्रेम बरसवीन
कांचनतेजी मढवून टाकीन
तुही सुंदरी अलौकिक, मज
केवळ बघता मोहित मी रोज

असे आपुले युगायुगांचे
प्रेम पाहते विश्व आगळे
मी तुझा नि तू माझी सदैव
हे का सांगणे पुन्हा वेगळे

विश्व तुझे फिरे भवती माझ्या
तुझे हे असणे सुखावे मजला
ऋतुही सारे दिमतीला तव
चंद्र तारका मीही तुजला

दि. ५/१२/१९
सकाळी ७.५३ वा.



## (३१)
## तिन्ही त्रिकाळी

पृथ्वी आप तेज वायू आकाश
पंचमहाभूतांचे विश्व
पृथ्वीवरती जल राहतसे
आकाशी तो तेजोगोलक

वायू यांच्या मध्ये फिरतो
दूत बनून सांगावे घेऊन
तिन्ही त्रिकाळी चित्र वेगळे
सौंदर्याला घ्यावे पाहून

तेज सांडते पाण्यावरती
पाण्याला सोन्याचा रंग
डोंगरा आडून वाकून पाहतो
धरा राहते त्याने दंग

असा खोडकर सूर्य रोजची
लपाछपी त्याची असते
एक न जागा साऱ्या दिशांना
तेज देण्याची घाई दिसते

रोज सकाळी तो दिसतो
जगण्याची जणू संधी तो
शांत पहुडता निशीसमयीला
चंद्राला तो पाठवतो

जगणे म्हणजे काही न दुसरे
या पाचांचा खेळ असे
वारा आकाशातून शरीरी
आकाशातच झेपतसे

तो आहे या शरीरी आपण
रोज भेटू या उत्साहाने
चित्र पहाटे उदयाचलीचे
नेत्री साठवू नवरंगाने

दि. २१/१२/१९
सकाळी ७.१६ वा.



## (३२)
## आभायानं उघडून दार

झुंजूमुंजू झालं
पाखरानं गाणं गाईल
आभायानं उघडून दार
पृथ्वीकडं पाहिलं

आलो अगं घेऊन खऱ्या
रंगांच्या मी छटा
उठ गं सखे जागवाया
मधुर सुरावटा

येईल बघ अरुण रथी
घेऊन सुर्व्याला
लाल केशरी रंगांचा
इथं गलबला

हळू हळू सोनकिरणं
अंगावर तुझ्या
उठली माझी सृष्टिराणी
जागवतोय राजा

पहाटेला रंग थवा
पसरला जवा
मोरपिशी आभाळात
कृष्ण घननिळा

धरा होई राधा आणिक
रास क्षितिजाला
कोडं गोड उलगडं
सृष्टीभर लीला

दि. ०९/०७/१९
स. ०६:०५



## (३३)
## तेजोमय परिणय

ये रात्र मुकुलिते
गात्र नमविते
देह तुझ्या स्वाधीन
निद्रा येऊ दे सुखासीन

तनुभाव निजले
दीप श्रांत विझले
शांत स्वपा लागली
तरी स्वप्नी कोण जागले

मधुर निद्रेची करू सांगता
अरुणोदय सूर्यास आणता
पीत रक्तिमा आकाशातून
किरणांची लावण्ये देखता

तेजपुतळा कांतिचितळा
भास्कर उदयाचला
प्रेरणेच्या किरणहस्ते
जीवन वितरणकला

निशादेवीच्या गर्भामधुनी
उज्ज्वल बिंबोदय
उषेस हाती घेऊन जगती
तेजोमय परिणय

दि. २३/७/१९
सकाळी ८.२७ वा.



## (३४)
## उठता सकाळी

दिवस उजडतो चैतन्याने
उठून ते साठवून घ्यावे
की अंथरुणात लोळत पडून
प्रकाश सोहळ्या गमवावे

भल्या पहाटे प्रसन्नतेचा
आकाशातून पडतो सडा
वेचून घेऊन शरीर मनाला
उत्साहाचा द्यावा धडा

किलबिल किलबिल चिमणी पाखरे
दैनंदिनी सुरू करती
इवल्या इवल्या कंठामधुनी
सृष्टीगीत ती गाती

नदी झुळझुळे आनंदाने
मार्ग पुढे चालते
सागरास भेटण्या अंतरा
प्रभातीस ती काटे

झाडेवेली ताज्यातवाण्या
झटकून अंगा होती
फळे फुले साऊली
देण्यास सरसावून येती

आकाशातून नानावर्ण
धरित्रीस स्पर्षती
इंद्रधनुचे रंग चांगले
रोज तिच्यावर बरसती

सृष्टी सारी जागी होऊन
कार्यास गती ती देते
आपण उठून तिला पाहता
मन उभारी घेते

झोपून नुसते स्वप्नं पाहता
कोण पुरे करणार
अंथरूनही झेलून तुम्हा
थकलेले असणार

प्रातः काळी उठून मग
स्वप्नपूर्तीसाठी धावावे
कवेत चटकन येईल तुमच्या
त्याला प्रयत्ने गाठावे

उठता सकाळी आरोग्याची
साथ लाभे उत्तम
शरीर, मन दोन्हीही प्रसन्न
प्रेरित अंतर्मन

देवांचे दिव्यत्व सापडे
आकाशातून प्रभा
रोज उठू या ब्राह्ममुहूर्ती
ज्ञान मिळविते आभा

दि. २४/७/१९
दुपारी १२.३७ वा.



## (३५)
## ही सकाळ पाऊसवेडी

ओझे दवाचे झाले
नाजुकशा पानुलीला
परी हार टपोर मोत्यांचा
तिने घातला की गळ्याला

तिचा रंग लालसर कवळा
पानुली स्वभावही हळवा
दव भिजल्या अंगावरती
हिमस्पर्शी ओघळ बावळा

थेंबात दवाच्या दिसते
पानांचे ते प्रतिबिंब
प्रतिमाही पानापेक्षा
अधिकच जराशी चिंब

पान कत्र कत्र नक्षीचे
टोक तीक्ष्ण सरळ सूचीचे
दव मुलायम पांघरता
पान मृदुल हो स्पर्शाचे

ही सकाळ पाऊसवेडी
मज तिचीच आहे गोडी
तन मन भिजून ओले
सुकलेपण कधीच सोडी

दवबिंदूंचे क्षण होता
आठवता पाऊस येई
मजवरी सुखाने बरसत
अवचित भिजवून जाई

दि. १४/७/१९
सायं. ७.०३ वा.



## (३६)
## नव्या दिसाची

नव्या दिसाची नवी सुरुवात
आयुष्यावर कर बरसात
प्रसन्न सकाळ ये झोकात
होडी तिची सुखसागरात

पहिले काम ती हे करते
आधी अरुणा पिटाळते
सूर्यरथाला सज्ज ठेवण्या
सांगून ती पुढे चालते

दिनमणी रथारूढ होऊनी
पिवळ्या केशरी झाकींमधुनी
प्राचीवरती पसरून तेज
डोकावतो आकाशामधुनी

बिंब तेजाचे ऊर्जेचे
दिसते सकाळी स्फूर्तीचे
पक्षी गवसणी घालिती नभा
पंखात रवीबळ भरण्याचे

ढगा ढगांना रंगीत वेश
किरणांचा सर्वत्र प्रवेश
आकाशाची ललना खुलते
रोज स्वतःवर स्वतःच भुलते

उषा लाजरी प्रियकर रवी
तिच्या मागावर तो सरसावी
ती पळते जरी पुढे पुढे
कवेत त्याच्या ती सापडे

सुखद सकाळ रम्य दिशा
वसन सोनेरी नेसे उषा
अलंकार तिचे कांचनपिवळे
मुखचंद्रावर नवीन आशा

अशी पहावी रोज सकाळ
हृदय कोंदणी सुरेख माळ
आयुष्याच्या भाळपट्टकी
ईश्वरा दे नित शुभकाळ

दि. २४/७/१९
दुपारी १.५१ वा.



## (३७)
## रम्य उत्तरे कुणी मांडियले

रंगबिरंगी फुलली पुष्पे
रांगोळी जणू रंगीत वठली
अशी प्रसन्न ही सकाळ पाहता
नंदनवन खुण सुंदर पटली

हिरव्या हिरव्या पल्लवांवरी
गेंद फुलांचे खुलून आले
जणू हास्य ते देवस्त्रियांचे
वसुंधरेवर भुलून आले

ती मृदुता कोमलता लेवून
दलादलातून उमलून स्पर्श
गालावरती फिरते हलके
मोरपीस जणू देऊन हर्ष

या नयनांनी भुरळून जाऊन
असे देखणे चित्र पहावे
अन कुसुमांच्या लाडिक गावी
सृष्टीसंगे मित्रची व्हावे

लाल गुलाबी पिवळे केशरी
अत्तर कुणी हे सांडियले
उगाच प्रश्ने भेडसाविती
रम्य उत्तरे कुणी मांडियले

रमले तनमन रमले जीवन
अंतर्मनी उद्यान प्रकटले
क्षणात साऱ्या मज दुःखांचे
गोजिरवाणे पांगची फिटले

दि. २८/०८/२१
सकाळी ०७.२१ वा.



## (३८)
## गोदा बहरून येवो

रंग गुलाबी अबोली
आभाळाचे पांघरून
लाली गाली उतरली
पाणी गेले की रंगून

अशी सकाळ फुटावी
गोदामाई ती नटावी
शुद्ध निर्मळ जळात
एक लहर उठावी

संत ऋषी मुनी जन
प्रभातीचे मंत्रगाण
सूर्यनारायण देवा
अर्घ्य तुला ते प्रदान

काठी वृक्ष लवलेले
जळी नभ टेकलेले
गंगा दक्षिणेची वाहे
क्षितिजही झुकलेले

उतरून देव सारे
जल प्राशण्यास आले
तृप्त होती जीव मग
तिच्या मायेनीच ओले

तिचा वाहू दे प्रवाह
नित भरला जलौघ
गोदा बहरून येवो
धरेवर शुभ्र रेघ

दि. १८/०७/२१
रात्री १२.१४ वा.



## (३९)
## पावसाळी ही पहाट

चिंब पावसाची वाट
धुंद प्रभातीचा थाट
सांज भास झाकोळले
थेंब सारे विसावले

कोसळून थकले का
नाही खेळले खेळले
थेंब वाट्टेल तसे ते
मुक्तपणे बागडले

वाट जशी ओली झाली
स्वप्ने जागेपणी आली
गंध अत्तरे लेऊन
दरवळा जाग आली

बीज पहुडले होते
प्रीत पांघरून मनी
अलगद अंकुरले
सरी येताच अंगणी

थोडी शिरशिरी येई
अंग चोरते ना भुई
परी गीत मनातले
तिचे रोमरोम गाई

पावसाळी ही पहाट
झोप साखरेची येई
सखी उठविण्या येता
निज गुलाबीच होई

दि. २२/०६/२१
सकाळी ०८.३३ वा.




## (४०)
## सुंदर जगण्या जमवा भट्टी

रोज सकाळी नव्या उमेदी
नव्या कलिका फूल होऊनी
प्रकाश पसरे नवकिरणेही
नभात उतरे स्वर्ग नवाही

अंगावर मी रंग आगळे
पाहून घ्यावे रूप निराळे
छटा अशा मग प्रत्येकाने
जीवनी द्याव्या पसरून त्या रे

फुले उमलती बघता बघता
उमलून जावे आपण अलगद
चंद्रसूर्याच्या किरणांसंगे
खुशाल सांगा मनास बागड

झुलवून द्यावे आपण आपले
तनही मनही वाऱ्यावरती
उगाच येऊ द्यावी कधीही
भावभावनांना ही भरती

कशास हवे ते हेतू आणिक
उद्देशांची गोंधळ पट्टी
खुल्या मनाने श्वास मोकळे
सुंदर जगण्या जमवा भट्टी

दि. १८/०६/२१
दुपारी १२.३५ वा.



## (४१)
## स्वप्नं रोज कांचनाचं

लख्ख सोनेरी रेशमी
ओढ ओढून दुशाली
रोज उन्हाच्या कोवळ्या
पसरती या खुशाली

झाडं तरतरतील
जरा शिरशीरतील
एक नवी सुरुवात
जीवनात आणतील

पान पान सोनचाफी
हिरवाईचा सोहळा
हासू लाजून लाजलं
सोनं सोनेरी बोहला

स्वप्नं रोज कांचनाचं
नीज सुवर्णाची होते
एक सकाळ वेडी ही
समर्पणाची की होते

गूज गुपित प्रभाती
लपवून सारे हाती
करी उधळून सोनं
किरणं सूर्याची ही जाती

दि. ११/०६/२१
रात्री ११.३२ वा.




## (४२)
## हा चांदवा दुष्मन जसा

हा चांदवा दुष्मन जसा
मन जाळतो नि उफाळतो
हाती चांदण्याचे शस्त्र त्याच्या
मी अजुनी त्यावर भाळतो

दडुनी मेघांच्याही मागे
डाव गनिमी खेळतो
किती दूर तो तरी सागराला
भरती आणिक आणतो

मन माझे का कितीदाही पाहून
त्यास इतके उतावीळ
ती रात्र जणू रणभूमी असते
नसता प्रियतमा मजजवळ

ना पाहिला दुष्मन असा
जो आत आतून पीडतो
वरवरती पाहुनी त्यास मी
मोहजाळ्यातून अडकतो

असू दे जरा छळता असा
तो चांदवा नभी पाहिजे
मनमंदिरातील देवतेला
प्रीतराधन होईजे

दि. ११/०६/२१
सकाळी ०९.११ वा.



## (४३)
## सर्ग निसर्ग हासरा

सर्ग निसर्ग हासरा
सुंदर दुलई आवरण
कोमल करांनी जपू या
चला आपुले पर्यावरण

सूर्य उगवतो पूर्वेला
आभा पसरते जगण्यात
रजनी चांदण्या लेऊन
न्हाती धुती चांदण्यात

उडती आकाशी पाखरं
गाणी आनंदी गाऊन
वहाती नद्या धबधबे ही
झरे येती खळाळून

डवरून फुलांच्या गोंदण्या
डुलती झाडं न वेली ही
हिरवी तृणांकुरे बाळे
बिलगून आईला खेळती

सारे ऋतूंचे सोहळे
भाव तरल नि कोवळे
गंध मातीचा दिगंती
पंचप्राण सुखावले

सृष्टी माय अशी आपुली
देता कधी न थकली
आपण हानी पोचवता
ती त्या दुःखानं वाकली

नको खोदणं डोंगर
खोल जमीन पोखरणं
दूषित हवा पाणी वायू
विष हे निसर्गी घोळणं

पर्यावरण प्रेम माया
त्याला मायेनं जपावं
धरणी माईला आपुल्या
झोकं सुखाचं झुलवावं

दि. ०५/०६/२१
सकाळी ०८.५३ वा.
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त



## (४४)
## सुगंध दरवळ कस्तुरी शोधणं

चल गं हरणे आसरा घेऊ
तिन्ही सांजेला घरकुल पाहू
दिनभर हिंडून थकला दिनमणी
पाखरंही परतून चाललेत गगनी

घरट्याची ओढ कशी सगळ्यांना
उबदार प्रेमाची घरं ज्यांना
तुझं नि माझं घरकुल राणी
रानात आडोसा डोळ्यात गाणी

पाडस गोंडस खोडकर चंचल
आज जरा उशीर झालाय चल चल
बावरलं असंल, घाबरलं असंल
मायेच्या नजरेनं अलगद उचल

थोडं रेंगाळलो, निवांत चाललो
झाडांच्या आडून आकाशाशी बोललो
उंच झाडाआड, दिनकर पल्याड
एकमेकांवर पुन्हा गं भाळलो

अगं अगं हरणे, एक ध्यानी धरणं
सहजीवन बघ सुखाचं करणं
जाताना एक दिस मावळती नेतो
नव्याच आशेला घेऊन उगवतो

असंच सुंदर असावं जगणं
पाऊलखुणा राणी वनात सोडणं
सुगंध दरवळ कस्तुरी शोधणं
आपल्याच आतलं अमूल्य जाणणं

दि. २४/०५/२१
रात्री १२.१६ वा.



## (४५)
## सुन्न मनाची विषण्ण दारे

अथांग सागर प्रवास इथला
दोन गलबते अशी साथीला
रात पुनवही चांदण वेळा
तेजोहीन परी का हा चांदवा

उगा उदासी पसरून गेली
चेहऱ्यावरती मंद चांदणी
काय जाहले आज ह्या राती
लुप्त चांदण्या बघ आकाशी

पाण्यावरती प्रतिबिंबाच्या
मंद तेजाने लाटा शिणल्या
आणि तरंगी हुरहूर हुरली
सागर वेडा असाच दमला

प्रवास होतो होतंच राही
अंतर काही कटतंच नाही
आतबाहेरी सुन्न विचारी
असे प्रवासी संकट दारी

कुणी ना सोबत तरी गलबते
साथ देऊनी पुढे चालली
अजून काही दिस येई अमावस
दिसामाजी ही उदासी वाढली

कंटाळवाणे वातावरण हे
सुन्न मनाची विषण्ण दारे
आज न वाहून वाहत येती
कुठून अनोळखी विचित्र वारे

असा नकोसा प्रवास जीवन
कधीतरी हे उदास की वन
एकटे आपण समूह असूनही
एकटे जाणे एकटेच मन

दि. ११/०५/२१
सकाळी १०.२९ वा.



## (४६)
## आंबा हापूस पाडाचा रसाळ

राघूमैनेची फराळी सकाळ
आंबा हापूस पाडाचा रसाळ ।।धृ।।

जोडी जोडीनं चोच ही मारली
गोडीगोडीनं गोडी ही हेरली
गराची चव अति मधाळ
आंबा हापूस पाडाचा रसाळ ।।१।।

आमराईतली सैरंच न्यारी
वसंत आणतोय मेजवानी भारी
अशातंच आंब्याचा सुकाळ
आंबा हापूस पाडाचा रसाळ ।।२।।

गरमीनं हैराण जीवाची दैना
काहिली होतीया कासावीस मैना
ग्रीष्मात अमृत चाखाल
आंबा हापूस पाडाचा रसाळ ।।३।।

तुझं नि माझं असंच प्रेम
राघुमैनेचं गुळपीट जुनं
जगू या राणी खुलं आभाळ
आंबा हापूस पाडाचा रसाळ ।।४।।

दि. ०१/०५/२१
सकाळी १०.२१ वा.



## (४७)
## एक झाड आयुष्याचं

रान गुलाबी जांभळं
गुलबक्षी तुऱ्यांचं
एक झाड उभं वाकडं
तरी ऐटीत तोऱ्यात

आला पल्याड डोंगराच्या
तेज घेऊन हा सूर्य
रान गुलाबी पाहून
दिंमूढ झाला सूर्य

देतो पसरून त्यावर
किरणं सोनरी सोनेरी
गुलबक्षी रंग लाजे
येते अंगावर शिरशिरी

सोनसकाळी चालतो
खेळ खट्याळ दोघांचा
रानराणीच्या रंगावर
भुलूनिया रविराजा

अशी सकाळ पहावी
दुरदुरुनी कोठुनी
मनी गुलाबी रंगाच्या
पडू द्यावे उन्हं सोनी

मग खुलून येईल
जीवनाची प्रभात ही
एक झाड आयुष्याचं
कसं दिसं देखणंही

दि. १७/०४/२१
०९.०३ वा.



## (४८)
## अशी एक सांज

अशी एक सांज
सारे रंग सोडते
सोनपिवळ्या रंगाचा
शृंगार मांडते

ते तिचे रुपास तिच्या
सोने मढविणे
रंगाला उजळवुनी ते
नभी चढविणे

थकलेल्या दिनकरास
देई निरोपा
तोही मालवून जाय
देख त्या रूपा

येई हळुवार नभी
चंद्र राजस
सजलेली सांज होय
किती तेजस

दीप पेटतील घरी
सांज बहरण्या
कुंपणे न घाला आता
मना विहरण्या

दि. ०८/०४/२१
०६.२१ वा.




## (४९)
## सकाळी थोडे

चल चल जाऊ सकाळी थोडे
फिरूनिया येऊ
रम्य अशा या ताज्या ताज्या
हवेसे गे खाऊ

हिरवीहिरवीगार शेते ही
लवलवणाऱ्या पात्या
हिरवी झाडे हिरवी पाने
स्वप्नं हरित सांगत्या

खुले नभांगण खुली हवा ही
असे मोकळे गाणे
दोघे जाऊ सोबतीने अन
छेडू सुरेख तराने

जरा टेकू या खुड बुंध्याशी
कुंपण तारांवरी
पाहू जोडीने चित्र सुरम्य
पैलतीराच्या वरी

रंग सारखे रूप सारखे
चित्र असे देखणे
जिथे जोडीने जातो आपण
मनास आकर्षिणे

चल चल राणी प्रभात गाणी
मंजुळ सूर असे
निवांत बसणे प्रसन्न असणे
जगणे सुंदर दिसे

दि. १७/०३/२१
सकाळी १०.२३ वा.



## (५०)
## धुकाळलेली ही सकाळ

धुक्याच्या पडद्यामागे
लपवला रविराजाला
सारे सारे न्याहाळता
चलबिचल उषामनाला

रोज रोज पाहती त्याला
लोक किती नजर ती लागे
सुंदराचे रूप दिनकर
तेज त्याच्या मागे मागे

आज जरा वाढली थंडी
धुके गेले दाट पसरून
उषा म्हणे थांबा जवळी
कामं सारे तुम्ही विसरून

साखर झोपेची आज
लाभावी पहाट धुंद
नित्यक्रम आहे रोजची
आज वेगळाची गंध

नभ कसे धुके धुके
झाडं पांढुरकी फिकी
खग उडताना भ्रम
गेले कुठे आकाश की

धरतीला पहा आज या
तलम पडद्याच्या आतून
अंग ती चोरताहे
धुक्याच्या पांघरणातून

आपणंही थांबू थोडे
रेंगाळून जाय सकाळ
कुशीतसे घेऊन मजला
चाला आकाश ढगाळ

दि. ०५/०१/२०२१
सकाळी ०९.५१ वा.



## (५१)
## रात रातीला

खरे प्रेम ना
असे का पुससी
डोळे माझे
वाच ना

दिसशील तू बघ
तुलाच वेड्या
नयनी माझ्या
उगाच ना

शब्द कशाला
शपथ कशाची
कशास तुजला
साक्ष हवी

डोळे बोलत
राहतील तुजला
क्षण सारेऽऽऽ
डोळेच सांगतील

मी मिटले तरी
प्रामाणिक ते
तुला सदैव
आठवत बसतील

लज्जा होऊन
कधी झुकतील
कधी पाहता
तुज वाकतील

तुला पाहण्या
तरसून सखया
रात रातीला
जागत बसतील

शुभ्र दलावर
कृष्ण बाहुल्या
चंचल चल त्या
बावरून जातील

उघड उघड
ना कळो तुला
मग प्रेम दडवण्या
अभिनय करतील

तू डोळ्यातून
वाच प्रियतमा
प्रेमाचा सागर
भरतीचा

शब्द न फुटती
ओठी माझ्या
डोळे बोलती
अनुराग प्रीतीचा

ते तुला न देतील
चैन जीवाला
साठवून घे
सारा संसार

मी त्यात पाहते
जन्मभराचे
प्रेम आपुले
अपरंपार

दि. २९/८/१९
सायं. ७.११ वा



## (५२)
## धरणी आरसा

आभाळाची छाया अशी
शिरावर राहो
आरसा हा धरणीचा
नितळ नितळ आहो

जळी त्याचे प्रतिबिंब
मोहक वाटावे
अंधाराचे जाळे बघा
क्षणात फिटावे

काय काय उदरी त्याच्या
ब्रम्हांड सारे
चमचमत्या चांदण्या नि
ग्रह गोल तारे

मार्ग व्योम होत जाय
धरा स्वर्गाचा
पथिक खग येती उडत
ठाव मर्माचा

रंग किती सुंदरसे
छटांचे आंगण
केशरी, निळ्या, राजस
रंगांचे ते रिंगण

इंद्रधनू उमटते
जरासे लाजून
प्रेयसीस पाहते की
असे वाकून

उंच उंच शिखरे जाती
चुंबीण्यास त्याला
रम्य निसर्गाचं देणं
लाभलं आभाळाला

कृष्णमेघ दाटतात
जळ भरले जेव्हा
वर्षावाने सुखावते
धरणीमाय तेव्हा

मेघकांता विद्युलता
चमकते मधेच
आकाशात तेजरेख
लखलखते एक

सूर्य उगवतो नि
तेज पसरतो प्रकाश
गर्भात रात्रीच्याही तेथे
चंद्र देई साथ

रात्र पौणिमेची रसिक
वेडावून जाई
प्रियतमेच्या केसातून
चांद जाईजुई

चातक, चकोर सारे
नभा पाहताती
अर्घ्य कोणी इथून त्याला
श्रद्धे वाहताती

कोपावता मार्तंड तो
ताप झाकविण्या
मेघा आणून नभ
धरती दिलासण्या

प्रियजन सोडून जात
आकाशी चांदणी
आठवांनी अश्रू गळती
हृदय गोंदणी

आभाळ भरून येई कधी
झाकोळते सृष्टी
कधी नभा पाहताच
ओलावते दृष्टी

बाप आभाळचि होई
माय धरणी
विशाल हे मन करावे
स्वच्छ करणी

गगनाला साद दे
आकाश ठेंगणे
अनंत ईश्वराचे
तेची रूप सांगणे

कृष्ण सावळा नभात
पाहतात जे
आकाशगंगा त्यात
मुक्त वाहतात रे

क्षितिजावर मीलन
धरतीसवे कधी
रम्य सुंदराचे भास
तत्त्व अनादी

दि. २६/८/१९
सकाळी १०.११ वा.




## (५३)
## किट्ट अंधार

पानझडी झाडावर
काट्याकुट्या राहती
रातीला ही तिथं बघ
रावे सारे थांबती

किट्ट सारा अंधार की
रंग झाला सावळा
सभोवती हिरवाई
रावा झाला बावळा

झोपू या निवांत तर
वाहनांची कर्कश
पडे तो प्रकाश डोळे
सोडतात निद्रापाश

अंग चमकून निघे
रावे सोनसोनेरी
एकमेका पाहताना
दुःख होय अंतरी

हिरवागार रंग कुठे
गेला काही समजेना
कसला हा प्रकाश की
जादू काही उमजेना

रातभर झोप नाही
अंग फांदीवर थके
प्रभातीला उगवला
सूर्य आता नीट दिसे

आहे आहे आहे की रे
रंग तोच आपुला
कसला तो प्रकाश की
रंग हिरवा झाकला

रावे उडले उंच उंच
तम निराशेचा गळाला
आनंदाची हिरवाई
थव्यासंग आभाळाला

दि. २०/८/१९
दुपारी ४.११ वा.



## (५४)
## पहाट डुलली

सूर्यविकासी कमळं फुलली
पहाट कमलदलातून डुलली

सोनसळी त्या उन्हात कमले
रंग सोनेरी लेऊन आली

प्रसन्न चित्ते प्रसन्न परिसर
प्रसन्न सारे सरोवर दिसते

उमलून आल्या पाकळ्यातुनी
हरिलक्ष्मी मधुरतम हासते

दिनमणी उदयाचली उगवता
एक प्रेरणा घेऊन येतो

प्राचीवरती चित्र सोनेरी
रोज सकाळी रेखून जातो

दि. १/९/१९
सकाळी ७.२३ वा.



## (५५)
## शेवटाची ज्योत मी

ज्योत एक तेवते
तुझ्या मनी माझ्या मनी
सांगते किती सांगते
अर्थ आहे जीवनी

तू मला तम दूरताना
पाहसी निवांत रे
मी ही लाजून थोडी वाकून
तेज देईन सारखे

क्षण तुझे क्षण माझे
दोघे एकरूप होताना
साक्ष होऊन वाढवीन
मी प्रेमभरते येताना

रात्री कोण्या घास भरवीत
तू प्रियेला न्हाळीशी
मी मधोमध भाव नयनी
ज्योत होऊन पाहिशी

तू उजळशील घर तुझे
मी तेज देईन एवढे
भक्तीप्रेमाच्या कथा
होतील ऐसे साकडे

आरंभ मी सुखशांती मी
शेवटाची ज्योत मी
रुधिर वाहे रूप तुझे ते
मी त्यातली ही स्फूर्ती की

दि. १३/९/१९
सायं. ७.२१ वा.



## (५६)
## रोज धनवान होतो

झुंजुमुंजु पहाटंला
सुर्व्या डोंगराच्या आड
सोनं उधळंत येई
रोज नवीन आल्याड

झाडं येली तरारती
परकाशात न्हातीधुती
उषा येताच दाराशी
आशा कोंबवून जाती

रामाच्या पारी जावं
शेतामंदी बिगिबिगी
ढवळ्या पवळ्याची जोडी
वाट खिल्लारी तुडवी

वाट रोजचीच परी
रोज नवी भासतीया
माझ्या स्वागताला ती
सजुनीया बसतीया

पानाफुलांशी बोलत
एक सकाळ होतीया
गवताची पाती बगा
कानी काही सांगतीया

दौडत शेता जातो
तिथं राब राबतोया
माझी लक्ष्मी शेताची
भरभरून देतीया

रोज धनवान होतो
म्या तर तेजाळून जातो
आरोग्याची लयलूट
पहाटंला जी करतो

दि. १६/९/१९
सकाळी ६.११ वा.



## (५७)
## सायंकाळी उमले सायली

सायली सायली
नाजूक राणी
पाकळ्या कवळ्या
रातीला गाणी

सायंकाळी ही
उमले सायली
गंध रात्रभर
टोपली टोपली

शुभ्र कळ्या तिच्या
फुलेही धवल
सृष्टीचे सुंदर
गोंडस नवल

परिमळ गडद
श्वासात भरे
सायली संगे
अंगण स्मरे

माझ्या माहेराची
सय सायली
कुंपण झालेली
वेल सायली

तिची नि माझी
नाजूक गट्टी
तिच्यासाठी मी
आजही हट्टी

पाहून तिला
रडणे पळे
हास्याचे फवारे
जिणे आकळे

सायली तुझा
गंध उरात
हळवे भाव
येती भरात

हसण्याची तू
स्मितभाषा गं
निष्पाप भावना
तुझ्या मनात

गाली तू माझ्या
रुळत होती
कळी कळी तुझी
हातात होती

आजही माझी
अंजली पाहे
सायलीची वाट
उरात राहे

ते माहेर, ते
अंगण माझे
देवाच्या परडीत
सजणे तुझे

कशी विसरू
सायली तुला
माहेर झालीस
आजघडीला

दि. १/१०/१९
सकाळी ७.११ वा.



## (५८)
## सोनटक्का

किती सांगावं, किती बोलावं
सोनटक्क्याचं काळीज व्हावं
गंध देऊनी सुकुनी जाता
स्वप्न आभाळी फुलून यावं

शुभ्र एवढं चांदणवर्ण
तलम एवढं अंतःकरण
कोमलतेच्या सीमापार
दर्पण जैसे आरपार

नाजूकतेची नाजूक धार
सोनटक्क्याने केली पार
हात कसा मी लाऊ त्याला
अलगद त्याची रेशीम फार

ओल मिळावी वर्षावाची
खुले कळी ती आपसुक त्याची
थंड हिवाळा जपतो त्याला
ग्रीष्म वैरी हा जन्मोजन्मी

सायंकाळी खुले खुशाल
मध्यरात्रीला पूर्ण बहार
नाजूक टक्का सकाळी धस्का
सुकून प्रभाती जीव उधार

पातळ पातळ कवळ्याशार
तीन पाकळ्या श्वेतखुमार
मधे सोनेरी परागपिशवी
जपून ठेवतो जीवापाड

रंग एवढा धवलस्वच्छ की
हात लावण्या कचरे मन
फूल फुलूनिया दिसते जैसे
फुलपाखरू ते तनमन

ललना कोणी श्रमातिरिके
अथवा रुसुनी कोमेजते
उपमा तिजला याच फुलाची
कविमनालाऽऽऽ उमजते

सुगंधी द्रव्ये या गंधाने
सौंदर्याच्या उटी तैय्यार
औषध होते कधी फूल हे
नाजूक हळवी कुसुमनार

फुले हाताळू नका हो कोणी
सुकतील नाजूक अति अलवार
म्हणून कळ्यांचा फुलण्याआधी
विकण्या स्वतः भरे बाजार

दालन प्रासादातून याचा
गंध अलौकिक दरवळतो
प्रसन्न सुवास गाभाऱ्यासम
ईश जीवाला जणू कळतो

दि. २७/९/१९
रात्री १२.२९ वा.




## (५९)
## निळी सांजुली...

निळी सांजुली, खाली उतरली
मनकवडी ती, मनी घोळली
आकाश सारे निळे पांघरली
कधी ना मनातून ती सरली
निळी सांजुली...

हवेत नभ, कवेत नभ,
नभातले नभ निळावले
गर्भात तेज, गोळा सूर्याचा,
घेऊन नभ झाकोळले
मनात किती सांज पाकळ्या
अलगद आली उतरून खाली
निळी सांजुली...

हवेत शीतल, निळी निळाई,
गेली पसरून कुंद गंधाली
हातात हात, तुझा नि माझा,
न बोलताही बोले मनुली
एकटी रमली जरा नादावली
अलवार सांज बघ भाळली
निळी सांजुली...

वाटते संधी संपू नये ही,
सकाळी आणिक संध्याकाळी
निवांत गूज, रंग सुरंग,
टिळे अनोखे लेऊन भाळी
निळ्या सागरात निळ्या लाटांनी
किनारी निळाई बघ सांडली
निळी सांजुली...

दि. २७/१०/२१
सकाळी ०८.५७ वा.



## (६०)
## माळ दवांची उरते

झाला निशेचा लोळागोळा
थंडी गारठली
डोळा लागतो तिचा प्रभाती
गोधडी पांघरली

अंगावरती काटा फुलला
निशा ही कुडकुडली
कुशीत शिरूनी निशाकराच्या
लाजून गडबडली

चंद्र म्हणाला येई प्रिये तू
चांदणे मज उबदार
वर पसरले धुके बावळे
शहारे आणते फार

शीत ऋतूतील नीज गुलाबी
स्वप्नं ही उरातली
सखे सोबती प्रियवर असता
प्रीतही भरातली

ती चिडली बघ उगा रोहिणी
निशेस घेतो जवळी
म्हणून अबोला धरला तियेने
केली सूर्याला कागाळी

म्हणे दिनकरा उगवून लवकर
द्यावा मज पतीराज
शुद्ध न त्याला निशा लाभता
चमकून जाय नभात

गाली हसला अंशुमाली अन
उषा ही प्रकटली
घट्ट मिठी ती निशाशशीची
दिनपतीमुळे सुटली

कशास येतो ऋतू हा शीतल
वेडा गारवा पसरे
रात्रींना बिलगून जाणारा
प्रियतम मजसी विसरे

इकडे निशेच्या अंगावरती
माळ दवांची उरते
प्रियतम शृंगाराच्या खुणा त्या
पुन्हा पुन्हा मनी स्मरते

दि. १९/०१/२०२२
सकाळी ०६.५३ वा.



## (६१)
## पहाट ओली दवात न्हाली

पहाट ओली दवात न्हाली
थंडी गुलाबी आली
शृंगाराच्या मधुर महाली
वर्दी हुडहुडी गेली

झोप जाहली साखर गोडी
ऊब हवीहवीशी
कुणी उतरली अप्सरा जणू
झगा धुक्याचा ल्याली

सगळे दिसते पुसट पुसटसे
प्रीत स्पष्ट बघ झाली
मिठीत येते नावीन्याची
सुरभित गंध नवाळी

सूर्य उगवतो हळूहळू जणू
उषा त्यास बिलगली
निसर्गातुनी थंडीची किती
मस्त मजा चालली

चंद्र कुशीतुन निजला अजुनी
रजनी झोपाळलेली
स्वप्नं प्रियेला सांगताच मग
लाज गाली उमटली

पहाट ओली अंग चोरटी
ऋतुराणी शहारली
ऋतू थांबला न्याहळत तिजला
ती आपसुक जवळी आली

दि. २४/०१/२०२२
सकाळी ०९.०९ वा.



## (६२)
## हे स्वप्न सत्यात बस एकदा हो

असे स्वप्न आले पहाटे पहाटे
असे रंग दिसले पहाटे पहाटे

तू केशरी काठ पिवळीशी साडी
नेसून दिसलीस हाती फुलारी

मला वाटले शुद्ध सुस्नात तू ती
जणू भेटली मूर्त मजसी तू भक्ती

असा भेटू दे देव आराध्य तुजला
मागेन त्याला तुझे दान मजला

देशील देवा झोळीत माझ्या
हे पुष्प कोमलसे भाग्यात रहाण्या

हे स्वप्न सत्यात बस एकदा हो
ती सात जन्माची साथी सदा हो

दि. १०/०६/२०२२
रात्री ०७.५७ वा.



## (६३)
## ऊन थोडे पहुडले

हिरवळ दुलई ओढून कोवळे
ऊन थोडे पहुडले
थंडीमध्ये बाहेर येऊन
तेही वेडे कुडकुडले

आई म्हणाली नभराणी ही
उठ उठ बाळा लवकरी
कुडकुडणाऱ्या सृष्टीला तू
ऊब द्यावी झडकरी

बाबा सूर्यही म्हटले आवर
लवकर कर तू कामा
वेळ माझीही असते ठरली
वेळ ना मजला गमन्या

थांबा थोडे आई बाबा
दव हे गारवा देती
आपसुक मजला पांघरुणातच
मऊ मऊ दडवून घेती

थंडीमधली सकाळ थोडी
अशीच रमते गमते
म्हणून तर या कोवळ्या उन्ही
सृष्टी सारी रमते

दि. २७/०१/२०२२
सकाळी ०९.४९ वा.



## (६४)
## प्रेम लाभताच स्वर्ग

सुंदराचे रूप देवा
देवरूप होत जाई
नंदादीप सांजवेळी
सांजवेळी भक्त गाई

गाय गोठ्यात परते
परते ती वासराला
जाय चाटत मायेने
माया ओसरे डोळ्याला

कणकण भरलेला
भरलेला कोना कोना
माय मायेची ती खाण
खाण भाग्याचीच हो ना

लेकरात तिचा जीव
जीव वात्सल्य भरला
तिचे किती उपकार
उपकारे पुरलेला

नाही नातीगोती काही
काहीजण सांधलेले
रक्तसंबंध नसता
नसताच बांधलेले

जिवाभावाचं हे कोणी
कोणी येताच जीवनी
मन वसंतात जाई
जाई जुई खुले मनी

प्रेम जगण्यात आलं
आलं संजीवन झालं
नवं अंकुर फुटून
फुटूनिया वाढलेलं

प्रेम आधार भक्तीचा
भक्तीचा नि वात्सल्याचा
हृदयात खुललेल्या
खुललेल्या वसंताचा

प्रेम जिव्हाळा नि माया
माया आपुलकी झेला
प्रेम धागा विणलेला
विणलेला रम्य शेला

प्रेम लाभताच स्वर्ग
स्वर्ग जणू लाभलेला
भुईवर प्रेमवृक्ष
प्रेमवृक्ष वाढलेला

असो कोणतेही नाते
ना ते नाते ठरलेले
प्रेम ओलावा असू दे
असू दे ते भारलेले

दि. २२/०६/२०२२
सकाळी ०७.१६ वा.




## (६५)
## हळव्या रेशीमगाठी

हिरव्या हिरव्या रानामध्ये
सकाळ थांबे जरा
मऊ मल्मली वाटेवरती
रेंगाळते ती जरा

पुन्हा सोसणे दगड मोठाले
रखरखणारे ऊन
जागा ओसाड्या विराण जंगल
रुक्ष सारे वरून

अशी सुखाची जरा लाभते
विसावण्याला जागा
संपून जातो क्षणात एका
उभ्या जन्माचा त्रागा

पाने बोलती कानी काही
मनात हलचल होते
दडून राहिल्या प्रीतीने मग
काळीज चंचल होते

वरून झाडे देती सावली
उन्हे कोवळी येती
ऊब वेगळी जाणवते ती
जगी वेगळ्या नेती

रोज सकाळी सकाळ थांबे
इथे दवांच्या साठी
जुळून येती कितिकितीशा
हळव्या रेशीमगाठी

दि. २७/०८/२०२२
सकाळी ०८.३९ वा.



## (६६)
## लुभविते काजवी राग यामिनी

अंधाराच्या स्वागताला
काजव्यांची दीप अवली
ती असो रजनी ही चांदणी
अमावस्येची रात्र ओवली

टिमटिम टिमटिम दिवे चमकती
अंगावरती प्रकाश गाव
आपल्यामध्ये तेज असे तर
उजळून जाते तेजल नाव

किती असू दे रात अंधारी
किर्रर्रर्र किड्यांची साथ तिला
किती एकटी क्षणात वाटे
क्षणी काजवी हात तिला

चमचम चमचम दिवा इवलुसा
दमकत काजवे उडती सारे
जीव केवढा ज्योत केवढी
क्षण रात्रीचे होतील प्यारे

आकाशातील नक्षत्रांची
सुंदर चादर कुणी अंथरली
निशापती येऊन पाहतो
तमस्विनी भुवी हो मंथरली

अशी क्षपा सुंदरा मोहिनी
लुभविते काजवी राग यामिनी
अनुरागाच्या आळवी रागा
लुकलुक करते तन्वी दामिनी

दि. २८/०८/२०२२
रात्री ०७.५७ वा.



## (६७)
## नंदादीप

नंदादीपाची सय सारखी
कधी न होते ज्योत पारखी

सांजवेळी ती देते प्रकाश
दिवस सारा अंतरी आस

देवाजवळी तेवत राहणे
साक्षीभावाने सारे पाहणे

जळून स्वतः उजळून देणे
कळून सारे आकळू न देणे

ना शब्द काही, सुखदुःख नाही
अखंड तेवून तेजासी पाही

जीव होऊ दे निज नंदादीप
आपुला प्रकाश दावी प्रदीप

ही ज्योत इथली तेथ मिसळू दे
उधाण आनंदा मुक्ती उसळू दे

दि. ०२/०९/२०२२
सकाळी १०.११ वा.



## (६८)
## सोनेरी रंगात

एका ओळीत रांगेत
डेरेदार झाडं
त्यांच्या पानांच्या पसाऱ्यातून
ऊन खाली पडं

पानं हिरवीगार लाल लाल
मिसळून एकमेकात
ऊन्ह अंगावर झेलून
आली पिवळ्या सोनेरी रंगात

पायी पसरे गालिचा
स्वप्नमार्ग मऊशार
फुलापानांच्या जाळीत
सोनचित्र चमकदार

मला भेटेल इथेच
माझ्या मनीचा देखावा
निवांत क्षण सोने
इथं आनंद लुटावा

कुठून येईल का
राजकुमार मनीचा
हळव्या राजकन्येसाठी
फुले ताटवा वनीचा

पानसळी तिचा स्पर्श
वेड्या निसर्गाचा हर्ष
पहुडला जरा इथं
वारा शांत नि निवांत

स्वर्गीय सुख वाटे
रंग आसमंती दाटे
स्थिर चित्राचे सांगणे
जणु झाले हो बोलके

दि. २८/७/१९
सकाळी ११.४९ वा.



## (६९)
## कळ्या सकाळी

कळ्या सकाळी मोगऱ्याच्या
येऊन बसती थाळी
कधी न सुकती गंध पसरती
अंगणी रानोमाळी

आठवणींचा गुच्छ न त्याचा
गजराच विणावा लागे
स्नेहधाग्याने ओवून त्याला
अवलीत बांधावे लागे

दोन मोगरे देठ जोडले
दिशा दोन बहरल्या
सुई टोचली तरी ना कळली
वेड्या मोगऱ्याला

दिसते त्याला तिच्या जवळचे
केशकुंतली रमणे
अन रमणाच्या हातून तेथे
माळून स्वतःस घेणे

तिच्या अंगच्या गंधकळ्यांना
हुंगून टिपून घेणे
सुवास भरता तनामनातून
स्मृतिकोश मोगरा होणे

केशकलापी गप्पा रंगती
कुंतल, मोगऱ्याच्या
केश सांगती भावकथा
बघ तिच्या रोमरोमीच्या

एक गजरा तिने दडविला
आपुल्या उदरात
सुगन्ध देईल तिला सारखा
राहील तो भरात

असा मोगरा होऊन गजरा
तिच्या वेलीवरती
फुले उमलती गूढ सांगती
आयुष्या भरती

दि. २९/७/१९
रात्री ८.१७ वा.



## (७०)
## आकाशाने पहाटेला

क्षितिजावरची लालिमा
सरोवरात बिंबिली
आकाशाने पहाटेला
हळूच धरणी चुंबिली

लाजली ती लाजली
क्षितिजापाशी थांबली
लाल लालेलाल गाल
पाण्यात लपवू लागली

धुऊन घेता जळामध्ये
कपोललाली उतरली
धरा अजूनच क्षितीजाच्या
कुशीत लपून बावरली

त्यातच बिंब नारायणाचे
प्राचीवरती अवतरले
निद्रेत गुंगल्या विश्वाला
प्रेम तयांचे हे कळले

अशा लाघवी प्रणयवेळा
रोज सकाळी धरणीला
निशा कुशीतून उठवत येतो
आभाळसखा बघ तरुणीला

ती बघते, उठते आपुलकीने
त्याचे स्वागत करण्याला
सृष्टी रंगते त्या दोघांच्या
रम्य गोमट्या मेलनाला

जाग जागला शुभ्र पतंग
शोधत हंसी राजहंस
तिच्या मीलना उत्सुक तो की
अशा वेळेला असीम दिगंत

झाडे जागली, पानोपानी
उत्फुल्ल तयांचे दिसती रंग
प्रतिबिंबाने दोन वाटती
सृष्टीराधा नभश्रीरंग

दि. २८/७/१९
दुपारी ३.२१ वा.



## (७१)
## मळे चहाचे

मळे हिरवेहिरवेगार चहाचे
मऊ मखमाली हरित वर्णाचे
मज रोज खुणावती ते जवळी
मज बोटांना त्यांची नवाळी

पाठीवर घेऊन करंडी
जाळी जाळीची वेत टोपली
सकाळी सकाळी खुडण्या पाने
तयार ललना कामसुगरणे

ना कंटाळा कधी या कामी
चैतन्याची डोले पालवी
हाताने तोडून पाठीवर
टाकीत गाणे ती गुणगुणी

चहाच्या मळ्यांनी असे पेटलेली
घरातील चूल कधी विझलेली
तुमची सकाळ अन संध्याकाळ
चहाने माझे जीवन प्रतिपाळ

मी चहा न खुडते, सुखपर्ण तोडते
हिरवे हिरवे घरदार वाढते
मुलेबाळेही शिकली,
घेऊन आठवण इथली

मळे असेच पिकू दे देवा
चहापानांचा सुवास यावा
माझ्या रानाला साहेबी थाट
त्याच्या दिवाणखान्यात ऐट

घराघरात सजून बसला
आता चहाच स्वागती हसला
कप भरून येता सामोरी
सारा थकवा जाताना दिसला

दि. २८/७/१९
सायं. ६.११ वा.



## (७२)
## तेजोगोलक सूर्य देखणा

दिनकर नीलांगणी प्रभाती
नीलसागरी नौका
पाण्यावरती बिंब चकाके
त्यात हवेचा झोका

नीलमण्यांवर सुवर्णकण
हलकेच तरंगत येती
लाटांवरती सोनसळी
चांदण्या विहरत जाती

पाण्यावरती दिवे तरंगती
सूर्याने लावलेले
नीलवर्ण जलांगणी बघ
दीप असे तेवलेले

स्वर्गाचा दीप्तीमान खंड
आकाशातून पहातो
नभसागर अन सूर्यतेजाचा
मेळ अनोखा होतो

अशा क्षणाला नौकेमधून
बसून शांत तरावे
पंख लेऊनी आकांक्षेचे
खग होऊन विहरावे

सौंदर्याच्या सर्व कल्पना
इथे फिक्या पडती
नवपरिभाषा अर्था येऊन
लावण्ये झडती

तेजोगोलक सूर्य देखणा
आकाशाचा राणा
कांती प्रभेच्या लाटा उठती
त्यावर आरूढ व्हा ना

दि. २९/७/१९
सायं. ५.५२ वा.



## (७३)
## सकाळी सकाळी

सकाळी सकाळी
भुकेची आरोळी
निघाले पक्षी
शोधत तळी

मिळतायत का कोठे
किडे मकोडे
अळ्यांचे डोंगर
गटकून थोडे

चला चला चला
तळ्यावर चला
माशांचा तेथे
आहे गलबला

नाजूक पाऊल
टाकत पुढे
पकडावे लागतील
मासे गडे

चोचीला दाण्याची
केवढी आस
पण उडलो फिरलो
मिळेना घास

तपस्या करत
बसलोय मी
माशांची झुंड
निरखून जी

येतील येतील
मी गट्टम करेन
चोचीत चार पाच
एकदाच भरेन

खडकांच्या आत
लपलेत काही
दडलेल्या खेकड्यांची
आता खैर नाही

पाण्यात, जमिनीवर
झाडावर, अंगणी
मिळतोय का नाश्ता
चला करू पहाणी

एखादी सकाळ
पोटभर देते
तर एखादी
दिसभर उपाशी ठेवते

पुन्हा नव्याने
येते सकाळ
शोधायचे खाद्य
नको कंटाळ

चला पुन्हा उडा
मोहीम उघडा
दिसतोय दिसतोय
दाणा, मासा, किडा

फराळ सकाळचा
करून पोटभर
कवळ्या उन्हात
फेरफटका क्षणभर

दि. २१/७/१९
सकाळी ९.२७ वा.




## (७४)
## कसे गोडुले निर्मिले

घट्ट मैत्री पाखरांची
प्रेम देती निखळ ती
मोह कशाचा आहे का
जागा फांदीवर छोटी

येवो ऊन वारा पाणी
सारे संगती मिळुनी
सख्य निभावती दृढ
मैत्री ठरते अजोड

चारा दिसता कुणाला
बोलावती मैतरांना
नाही हेवेदावे तिथं
चोचीत चारा देण्या

पाणी पिण्यासाठी बघा
कशी उडती आनंदे
सरोवरात पाहती
आपुल्याच प्रतिबिंबे

रंग रूप कोणा कसे
देवाजीने की दिधले
चोच, डोळे, पंख, पाय
कसे गोडुले निर्मिले

आवाजात त्याचे गाणे
कंठ मधुर सुरांचा
किलबिलताना पाहे
चिमणा गंधर्व होताना

आकाशाची ओढ पंखा
मनातली ताकदाहे
घालू गवसणी त्याला
जीव फुलूनिया जाये

मग उडून उडून
उंच उंच आभाळात
पुन्हा वसुंधरेपाशी
सारं मिळे गणगोत

दिसभर काय केलं
काय आभाळी पाहिलं
खाली धरती, वरून
आभाळानं प्रेम दिलं

थोडं सकाळचं उन्ह
झेलू अंगावर तान्हं
तान्ह्या पिलांसाठी
चारा आणू चोचीत भरून

वेडी पक्षीण ही माझी
जीव ओवाळत राही
प्रेम चोचीने चोचीला
मीही सांगताना पाही

भेट घरट्याबाहेर
झाडावर कुठेतरी
मैत्री आपुली अशी की
ओढ साऱ्यांना वाटावी

किती दिस इथं जिणं
कशा कशाला हे भिणं
क्षण घालवू निवांत
मैत्र भाग्यानं लाभणं

दि. २०/७/१९
रात्री १०.१५ वा.



## (७५)
## तुझं माझं घरटं

तुझं नि माझं घरटं असावं
सरोवराकाठी
झाडं झुडपं हिरवळ तेथे
गवतफुलांची दाटी

बाग बगीचा भवती असेल
घरास शोभे फार
दारावरती जाई कमान
वाके हळुवार

गुलाब जाई जुई शेवंती
रातराणी, मोगरा
फुलला सुगंध पसरत जाईल
बघ घरादारा

चहू बाजूनी गवाक्ष असतील
भवताल पाहण्याला
रामप्रहरी वृक्षांचे येईल
खगगायन ऐकण्याला

किलबिल चिवचिव मधुर गायनी
पक्षी निवांत रमतील
दाणा पाणी चोचीत भरण्या
स्वच्छंदी उडतील

एक बंगई टांगू अंगणी
दोघा झुलण्याला
झुलता झुलता पाहीन तुजला
शब्द न बोलण्याला

पाण्यामध्ये सरोवराच्या
पाय सोडुनी बसू या
शीतल स्पर्शी शांत जलाच्या
रुसवे ते विसरू या

इथे सारखा सोबत करील
निसर्ग जवळीकतेने
कधी न वाटते मजला एकटे
त्या पाहत आपुलकीने

रोज रोज हे रम्य दृश्य बघ
शर्वरी घे पोटी
निद्रासुखाने पहाट येते
गुणगुणत ओठी

घरकुल आपुले इथे विसावे
नात्याला स्थिरता
कंटाळा ना कधीच येईल
उत्साह संचारता

कधी अतिथी रमतील येथे
कौतुक करण्याला
घर असावे स्वप्नामधले
सांगतील सर्वांना

दि. ३०/७/१९
सकाळी ६.५१ वा.



## (७६)
## असा प्रवास राहो स्मरणी

डोंगर खोदून वळण वाट
अवघड चढाचा असतो घाट

खोदणे सोपे ना बांधणे सोपे
वाटेवरून त्या जाणे ना सोपे

श्रम घेतले डोंगर फुटले
कडेकडेने मार्गही सुटले

पाषाण पोटी वाट गोमटी
मुठीत जीव न चाला पुढती

तरी वाटते घाटात जावे
वाहन आपुले पुढे काढावे

जाता जाता त्या भव्यतेला
हात जोडून प्रणाम केला

समोर प्रभाती सूर्याचे बिंब
पावसाळी मन इथेच चिंब

शीतल ऋतूत धुके पांघरून
डोंगरवाटा गडप होऊन

रोपरोपटी पाहती वाकून
आलंय कोण चाले जपून

खाली दरी बघ ती खोल खोल
फिरते नजर, पडते भूल

उंची दिसते पर्वत पाहता
दरी सांगे खाईमध्ये खोलता

दोन्हीही रूपे जीवनाची ही
सुखाचे डोंगर दुःखाची खाई

सुखा पोखरून वाट काढावी अन
दुःखाची खाई सुंदर वाटावी

असा प्रवास राहो स्मरणी
जगून घ्यावे चिंता न मरणी

दि. ३०/७/१९
सकाळी ७.५८ वा.



## (७७)
## दिस सकाळू सकाळू

फुले अळुमाळू
नाजूक स्वप्नाळू
रंग पाकळ्यात सारा
वारा जीव घुटमळू

वारा सावध सावध
वाहे शांत हळूहळू
कुजबुज फुलराण्या
येई धरित्रीला कळू

होई प्रसन्न फुलांचा
दिस सकाळू सकाळू
झरा बघ गाई गाणं
वाहताना झुळू झुळू

पराग पाहताती
रुजण्याला नवस्थळू
फुलपाखरं की दूत
नेती लगडून पायतळू

बीज एका भुईतलं
जातं दूर रानमाळू
तिथं आलं आलं फूल
नव्यानं फुलनाळू

७/१२/२०२३,
१५:०३




## (७८)
## झरोका

झरोका झरोका
असा पारदर्शी
घर दिसे डोंगराला
धुकं बिलगे डोंगराशी

इथं वाफळला चहा
डोंगराला की तल्लफ
कुडकूड थंडीमध्ये
गरमागरम पेय उफ

कप भरला चहाने
नजरेत थंडी भरा
फुटे पाझर पाषाणा
दव गोळा भरभरा

आत गुलाब फुलदाणी
खिडकीतून डोकावे
होतो बाहेर दवात
जरा घरातून निरखणे

गवाक्ष लांबरुंद
पारदर्शी एक छंद
सारी दृष्टी जाय तेथे
सृष्टी भर्रकन बंद

सकाळ थंडीतली अशी
जवळीक साधणारी
ऋतुसवे मनातल्या
भावनांना लाभणारी

थंड थंडी, ऊब आणि
मन प्रेमाने वाफाळे
पेय अमृताचे घेता
भाव आतून उफाळे

त्यात तिचा सहवास
सांज सकाळही एक
दिस तिलाच पाहतो
रूप दिसे वेगळेच

माझे प्रतिबिंब ती
तिचे मीही होत आहे
अशा ऋतुमीलनाला
जीव बरसतो आहे

दि. २८/७/१९
दुपारी ३.५२ वा.





(७९)

## एक फुलपाखरू

नाजूकशी फुले बसली जवळजवळी
एक फुलपाखरू की
आले हो सकाळी

ताटामध्ये निवांतशा
बसल्या फुलसख्या
शुभ्र मोहक कवळ्या
त्यांच्या की पाकळ्या

छटा निळ्या जांभळ्या
न नक्षीदार काळ्या
ठिपकेदार पाखरू की
फुलास पडती वळ्या

तेही रस चाखतसे
न हलता डुलता
डोळे त्याचे पाहताती
मान न वळता

किती वेळ तसेच ते
फुलांवर बसे
रसपान करताच
खुदकन हसे

म्हणे मी जातो आता
सांगत वनाला
फुलं तिथं उमलली
पत्ता ना कुणाला

कित्ती गोड मधुर असे
रस अंतरंगी
दिसती साधीसुधी फुले
शुभ्र वरपांगी

मी भेटलो तयांना
ती लाजाळू मुलखाची
स्पर्श झाला माझा नि
सवय त्यांची अंग चोरण्याची

मी हसलो आणि गाली
त्यांच्या उमटली लाली
फुलं गोड गोड पहावं त्यांना
रम्यशा सकाळी

दि. ३०/७/१९
सकाळी १०.१० वा.



## (८०)
## प्राची दिशा

कुंचला फिरला पहाटे
चित्रकाराचा जरा
उजळुनी प्राची दिशा
रंग वसन भरजरा

मिसळुनी रंगात सारे
रंग नाचू लागले
आज तेही गात वेडे
फेर घुमूही लागले

हा आला बघ रंग केशरी
पिवळाधमक अन तांबडाही
एक गुलाबी रंग त्यातच
मिसळुनी जाय अंबरी

आकाशी रंगाने थोडे
काढले की डोके वर
मोरपिशी मग रंग बसला
सजुनिया त्याच्याच वर

पांढऱ्या मोतीया रंगा
आज शोभा चांगली
सावळ्या हरीनेही आपुली
कृष्ण प्रभा मग टांगली

जांभळ्या रंगात न्हाऊन
कुंचल्याचा फटकारा
आभाळ दालन रंगारंगी
मेघमालेवर शहारा

हात ना दिसती तयाचे
चित्रकारही गूढ हा
नानारंगी रंगलेला
सृष्टीकारही मूढ हा

रंग ते स्वर्गातले का
असती केव्हा न्यून की
उतरुनी नभ अंगणी तो
निरखतो भुई सुंदरी

बंध त्याचे जोडलेले
रोज ये कृती घेऊनी
दाद देतेही धरा तो
चित्र रेखी स्व लपवुनी

गुप्त स्वतः राहुनी
कृती मांडतो आपुल्या पुढे
कार्य कारण भाव जाणून
क्षणक्षणा प्रचीती घडे

दि. १९/११/१९
सकाळी १०.५४ वा.



## (८१)
## रोज सकाळी मोहमोहवी

याहून सुंदर काय असेल ते
सौंदर्याचे उमलती मळे
गर्द गुलाबी ओष्ठराग हे
नाहीत केवळ हो कमळे

वर माथ्यावर सुवर्णबिंदी
कांचन झडते नित त्यातून
सोने पसरले मुखश्रीवरी
देत झळाळी तिज आतून

बट नटखट ती उडे खगांची
वाऱ्यावरती झुलताना
कर्णफुले होऊन मेघही
पहा दिसती किती डुलताना

रोज सकाळी मोहमोहवी
लावण्याची सृष्टीराणी
तिचे नितळसे बिंब देखणे
उमटून जाते अंतरातुनी

सुरेख सुंदर अप्रतिम हे
शब्द तोकडे तिज पुढती
रोज नव्याने सौंदर्याच्या
पदव्यांवर पदव्या चढती

दि. १७/११/२०२२
सकाळी ०८.३२ वा.




## (८२)
## रेघ एक थांबली ती

लागे सांजेला उगाच
मनी हुरहूर वेडी
दाटे काहूर तुझेच
संगे उदासीची जोडी

किती रमवावे मन
जीव कासावीस होई
घालमेल कसलीशी
कुठे ओढूनिया नेई

कुणी क्षितिजाशी दिसे
पुसटसे काही
कधीही ते जवळी पण
येत मात्र नाही

झाडे किती एकटी मज
भासतात रोज
एकटीच नदी गेली
वाहूनिया आज

कललेली उन्हे आता
अंधारात बुडती
किती तरी पाखरे मज
काळजात कुढती

रेघ एक थांबली ती
अचानक कोठे
न मागे फिरे पुढे मार्ग
हरवली कोठे
हरवली कोठे....

दि. २१/०५/२०२३
रात्री ०८.४८ वा.



## (८३)
## नवीन वर्ष नवी सकाळ

आज पहाट उगवून आली
सकाळ मागे मागे
कित्ती कित्ती मिरवून गेली
निशाही सारे जागे

पहिले पहिले जेही काही
मजाच वेगळी असते
पहिले प्रेम जसे काळजात
खोल रुतून बसते

सकाळ किती ताठ झाली
नवीन वर्ष आले
पक्ष्यांचेही कूजन मग
नव्या सुरात झाले

नव्या नव्या आकांक्षा अन
नवी स्वप्ने झाली
नवी उमेद हलकीशी
आतून जागी झाली

दरवेळी नवीन वर्ष
वेगळेच काही वाटे
वर्षाची सुरुवातही
सकाळ आगळी भेटे

तिचा जोर तिचा तोरा
असा साठवून घ्यावा
उरलेल्या दिवसांमध्ये
पुन्हा आठवून द्यावा

दि. ०१/०१/२०२३
सकाळी ०७.५१ वा.




## (८४)
## रोज सांजेला गगनी चाले

अहा अहा हे जळात केशर
नभी निळाई भाळून गेली
सांजतीरावर डुबतानाही
सुंदर किमया रवीने केली

लाटांनी हो गिरक्या घेऊन
एक रांगोळी पाणी काढली
नीरामध्ये रंग तरंगे
क्षितिजाचीही शोभा वाढली

मग उभे जे झाड सरळ ते
प्रतिबिंबाने अवचित झुकले
कुणा चित्रकाराची तबकडी
रंग मिसळुनी रंगच हुकले

पैलतीरावर काळी झाडी
गुडुप होईल क्षणात सारी
भरभर नेसून चंद्रकळा मग
खुलून जाईल निशा ही प्यारी

रोज सांजेला गगनी चाले
उत्सव सुंदर रंग सुन्यारा
वर जो बसला गाली हसला
उघडून देतो रम्य पिटारा

दि. ०१/१२/२०२२
सकाळी ०८.२३ वा.



## (८५)
## क्षण सुंदर जोडून

अस्सं सकाळी सकाळी
नको उठवू ना आई
बघ थांबते अजून
झोपाळलेली जांभई

उठ रामच्याच पारी
अंगा वळण रे भारी
नीज लवकर उठ
नांदे लक्ष्मी रे दारी

धार आनंदाची फार
गंगाळातली अंघोळ
बंब उबदार पाणी
तोटीतून ये चिंचोळ

भम भम भोले मिटा डोळे
सुख पाण्याचं केवढं
अच्छ स्वच्छ कच्छ व्हावं
शुभ्र ससुलं जेवढं

गेली गेली ना रे झोप
डुबुक डुबुक खेळताना
पाणी अंगावर घेता
ताजं तवाणं होताना

हो ग आई खरं बाई
कित्ती मला मज्जा येई
आता खूप वेळ मला
असे नाहू माखू घाली

चोळून मोळून तू मला
मालिश करतेस जेव्हा
तेलपाण्याने शरीर
भरते ना आई तेव्हा

रोज रोजची नाटकं
माझी लाडाची मोडून
आई देशील तू किती
क्षण सुंदर जोडून

दि. ०२/१२/२०२२
सायं. ०६.५४ वा.



## (८६)
## आस मधुरल्या क्षणांची

अशा उमलल्या बागेमधले
क्षण ते तुझे नि माझे
आजही प्रिया आठवते ना
सांज सुरावट गाजे

किंचित हलकी लाटांची ती
कुजबुज तळ्यात चाले
घरट्यामध्ये माय पक्षिणी
दाणे पिलांस घाले

तिथून आला गुंजारव बघ
कभिन्न मिलिंद नाचे
फुलभोवती कसल्या ओळी
प्रीतलेख जणू वाचे

सावल्या जरा ढळल्या आता
संध्या अवतरलेली
तुझी नि माझी जवळीक वेड्या
तशात मंतरलेली

सैर कितीदा झाली व्हावी
उपवन उद्यानांची
तुला सांगते आजही मला
आस मधुरल्या क्षणांची
आस मधुरल्या क्षणांची

दि. १४/०९/२०२३
सायं. ०५.५५



## (८७)
## अहा ! केवढे रम्य हे दृश्य

प्राचीच्या भाळावरती
मळवट सूर्य हा भरतो
ती सजून धजून बसते
सोहळा देखणा ठरतो

नववधू नव्याने नेसून
भरजरी प्रकाशी शालू
कधी रक्त तांबडा रंग
कधी केशर त्यातची घालू

माथ्यावर चमचम चमके
सविता तेजाची बिंदी
ती जळात निरखून पाहे
निज लावण्य प्रतिबिंबी

अशी नटलेली नवरी
रोज प्रभाती पहावी
एक शुभेच्छा ओंजळ
तिज पदरी हो वहावी

अहा ! केवढे रम्य हे दृश्य
सोनसकाळी दिसावे
म्हणून रोजच नवीन जीवन
नव संकल्पे हसावे

दि. २९/०१/२०२३
सकाळी ०८.३८ वा.




## (८८)
## क्षण मंतरले सहवासाचे

रम्य सकाळी धुके बोलवी
किती गूज मग चाले
तुझ्या नि माझ्या सहजीवनाचे
प्रीत बोलवे बोले

डवरून आली पानोपानी
रंग लेऊनी झाडे
फुलाफुलांच्या मनात उमटून
येतील रंगीत कोडे

नव्या पहाटे वाट नवी ही
उगा अंग चोरते
तुझ्या पावला संगे माझी
पदचिन्हे कोरते

शब्द नसावा, उगाच गोंगाट
हाती हात असावा
एकांताचा पहाट रागही
सृष्टीतून दिसावा

हिरव्या हिरव्या मखमालीच्या
हिरवळीवरती जाणे
मनात आळवून सुरासुरांना
जुळून येईल गाणे

पुन्हा कधीही पहाट गोडी
अशी आठवून घ्यावी
क्षण मंतरले सहवासाचे
स्मृती पाठवून द्यावी

दि. ०८/०१/२०२३
सकाळी ०९.४६ वा.




(८९)

**सकाळी सकाळी ...**

सकाळी सकाळी उगवली सकाळ
सकाळी सकाळी सुरम्य सुकाळ

गवतामधल्या उमलून आल्या
लाल चुटुकशा त्या फुलराण्या
हसले हसले खळीचे गाल
सकाळी सकाळी सुरम्य सुकाळ

झाडांवरती डवरून येते
झाड नव्याने चैतन्याचे
जळ मनाचे घाल
सकाळी सकाळी सुरम्य सुकाळ

रोज पहाटे वसंतास फुटती
गोड गोडाचे पाड
अन तुझी मोहवी चाल
सकाळी सकाळी सुरम्य सुकाळ

पसरून जाते छटा मंद्र कांतीची
सूर खगांचे कानाशी गुंजती
जगण्यास नव्याने चाल
सकाळी सकाळी सुरम्य सुकाळ

उघडून डोळे मन उघडावे
लुटून घेण्या पुढे सरावे
हे संपत्ती जाल
सकाळी सकाळी सुरम्य सुकाळ

सकाळी सकाळी उगवली सकाळ

दि. २९/०१/२०२३
सकाळी ०९.५४ वा.



## (९०)
## सृष्टी सौंदर्याची खाण

सांजाळल्या दाही दिशा
गोल गोलक पिवळा
निघे पश्चिम तीराशी
सूर्य साधक तेजाळा

करवा चौतीला चांदवा
चाळणीतून पहावा
मग साजन मुखडा
जसा तसाच चहावा

आज झाडांची चाळणी
रेघरेघांची गाळणी
वनी नटलेली चौत
त्याच्या तेजाची माळणी

किती देखणा दिसतो
जगताचा हा पोशिंदा
त्याचे प्रभातीचे रूप
असो सांजेचा कशिदा

सृष्टी सौंदर्याची खाण
पाहण्यास जरा जावे
क्षण टिपून आणता
झोळी भरूनिया यावे

दि. ०१/०२/२०२३
सकाळी १०.४३ वा.



## (९१)
## अलगद मिटवून

उन्हं कलली सांजेला
सांज झुकली किंचित
दबकत निशा आली
गगनात अवचित

तिच्या संगती स्वप्नांची
दाटी केवढी हो झाली
चांदण्यांची नभांगणी
एक झुंबड उडाली

उन्हं कलताच येई
पेंग दिनराणीला ती
तिचे अळोखे पिळोखे
जाग येई क्षितीजासी

तिचे हळुवार येणे
निलयासी दिन जाणे
चांद मातून आकाशी
ऊतू चांदण्याने जाणे

पुन्हा स्पर्श उमटणे
गंध वनात भेटणे
लोचनांना मिटुनिया
स्पष्ट मीलन वाटणे

उन्हं कलताच येते
हाक आतून जिवाची
ज्याची त्याला भेटीओढ
भाव मध ओतण्याची

रोज सांज साठवून
रोज रात आठवून
रोज दिस पाठवून
घ्यावा मिठीत राजस
अलगद मिटवून
अलगद मिटवून

दि. १०/०२/२०२३
सायं. ०६.३७ वा.



## (९२)
## त्या अंधारातून जागते

गाळून पडते इथे चांदणे
अंधाराची चाळण
काळ्या काळ्या कुट्ट रातीला
आशाफुलांची माळण

ही सरणारी न थांबणारी
कशास चिंता गहिरी
भीती अनामिक नको काळजा
ठरण्या देऊ जिव्हारी

कधी अमावस कधी पौर्णिमा
आत टिपावे धागे
त्याही क्षणांना जगुनी घेता
जीवन नवेच जागे

जरी अंधारली रात्र भयानक
घट्ट मिटावे डोळे
आत सापडे प्रकाश थोडा
स्वप्नंही काही भोळे

मग उघडावे अवचित दोन्ही
नेत्र नव्याने पाही
त्या अंधारातून जागते
वाट नव्याने काही

दि. ०५/०३/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



## (९३)
## रास रंगून हसे श्रीरंग

सुगावा लागला आता
रंग गेले कुठे होते
सकाळी प्राचीवर पसरून
सांजेला रंगले होते

रोजचे रंग निराळे जे
फुला पानात दडलेले
नभी उमटून इंद्रधनुने
रंग सोहळे ते घडलेले

दिशा रंगून जाताना
उषा रंगाळली जाते
निशा रंगात डुंबूनी
अशी गंधाळली जाते

रंग स्वर्गीचे उतरून
उद्यानी काननी खुलती
रंग पंखात मोराच्या
होत लावण्ये हो डुलती

रंग खडकात पाषाणात
रंग रतनांच्या खाणी
कधी हिरवे निळे भुरकट
कधी रंगीतसे पाणी

ही धरा रंगशालू ल्येते
ऋतूंच्या कमानीत न्हाते
रंग मनी होऊनी सरिता
सुखाचे दान देत वहाते

असे हे रंग दिसती बाहेर
अंतरी वेगळाले रंग
आतुनी जोडताच त्याला
रास रंगून हसे श्रीरंग

दि. ०७/०३/२०२३
सकाळी ०८.२७ वा.



## (९४)
## घ्यावी सोनेरी सकाळ

धुक्यातुन गाळलेली
घ्यावी सोनेरी सकाळ
तिची किरणं कांचनी
गळा मोतीयांची माळ

तिच्या ओठावर हसू
दिस झाला कसा सुरू
मंद वाहतो वाराही
तिचे केस भुरूभुरू

जरा वसन मोकळे
आता घट्ट केले तिने
बांध कंबर कसून
काम आरंभिले तिने

गेली चरचरावर
छबी आपुली टाकत
जळी दिसली सुंदर
जरा अवचित वाकत

सांज होईल तोवर
तिला दम नाही बाई
असा उरक कामाचा
तिला तेज देण्या घाई

क्षणी गोड हासली ती
क्षितिजास टेकली ती
पहाटेला रम्य कोणी
अप्सराच वाटली ती

दि. १७/०३/२०२३
सकाळी ०८.२८ वा.



**(९५)**

**क्षण उजळून जाती**

क्षण उजळून जाती
सोन पहाटे पहाटे
देव जागविण्या येतो
तेज किती दाटे दाटे

डोंगराच्या माथ्यावर
चंदनाचा टिळा टिळा
बिंब वर वर येई
ऊब झिळमिळा झिळमिळा

गवताच्या अंगावर
शाल सोनेरी सोनेरी
कळ्या फुलं उमलती
नाना रंगेरी रंगेरी

नभ आपुल्याच नादी
रूप पालट पालट
एक संपलं की दुजं
कोडं घालत घालत

झाडं वेली तेजाळून
रोज नवं जग जग
उंच उडालं आकाशी
मन होई खग खग

दि. १८/०८/२०२३
सकाळी ०८.३८ वा.



## (९६)
## ही उषा रमवून जाते

सुंदराच्या देखण्याशा या सकाळी
उठवुनी देहास दे सृष्टीस टाळी
हालणारी पल्लवे गातात काय
वाहणारी ही हवा छेडी गाली

त्या तिथे प्राचीवरी रविकिरणे आली
उगवून भानू तेजवर्षा गर्द झाली
रंग सारे येती उभरून अंबरात
आकाशपटली चित्रकारा जाग आली

ती नदी अजुनी जरा गुंगीत आहे
वाहते ना स्वप्न जळी रंगीत आहे
उठल्या लाटा ज्या कधी वेगात वेड्या
आज त्यांचे मौन हे संगीत आहे

थांबलेली होडी पाहे दर्पणाला
पारदर्शी जळ पुरे समर्पणाला
भाव सारे एकवटले लाजताना
ती सख्यासाठीच सज्ज अर्पणाला

काठ वाटे साखरेच्या झोपेमध्ये
दंगलेला तो अजूनही रातीमध्ये
पेंगुळली अंधार राणी थोडी थोडी
कस्तुरी केशर मिसळले संध्येमध्ये

शांत परिसर जागतो अवचित आता
ओळी पक्ष्यांच्या सुराने गाता गाता
जाग येते गाव बोलू लागताना
ही उषा रमवून जाते जाता जाता

दि. १९/०६/२०२३
सकाळी ०७.३७ वा.



(९७)

**सोन सकाळी सकाळी**

वाट तेजाळली कशी
सोन सकाळी सकाळी
केशराचा टिळा तिच्या
उजळला देख भाळी

तरारली वृक्षराजी
पानाफुलांची आरास
खग कूजन चालते
सूर आळव भरास

किरणांचा जाळीदार
पडदा ही लाज लाजे
दूर दुरून सागरी
लाट लाट जोरे गाजे

सारे गवत हुशार
उन्हं पांघरून घेती
दवबिंदू माळ गळा
सजवुनी मग देती

आहे आहे सारे आहे
जीव चैतन्ये डोलती
शब्देविण संवादाची
अशी मधुर बोलती

दि. १७/०६/२०२३
सकाळी ०९.२१ वा.



## (९८)
## सांज मोहरून गेली

इंद्रधनुची कमान
दूर वनी प्रगटली
स्वप्नं सप्तरंगी होता
सांज मोहरून गेली

तिची हिरवी कंच चोळी
चाल अबोली अबोली
थोडा उजेड नि थोडी
तेजकांती की सावळी

जाता रवीचा प्रकाश
मेघातून गाळुनीया
सारे रंग उमटती
अंबराशी माळुनिया

अस्ताचली दिनमणी
रक्त रंग पांघरुनी
चांद चंदेरी चांदणं
निज अंगी गोंदवुनी

आता भरे हुडहुडी
थंडगार कुडकुडी
तिच्या कुशीत शिरावं
निशा गोड गुडगुडी

होत गुडूप रातीला
झोपाळलेली पापणी
मन अबोध जागतं
सात रंगांची झापणी

दि. १७/०८/२०२३
सकाळी ०६.३८ वा.



## (९९)
## ती सांजवात...

अंगणातल्या तुळशीपुढती
ही जळणारी शांत वात
दिवा दाखवी अंधारीही
उजळ देखणी रोजच वाट

मालवला तो सूर्य जरीही
नंदादीपाची वहिवाट
चुकते न कधीही परंपरेने
सांजवातीचा रम्यच थाट

सांज होऊ घातली की घरची
लक्ष्मी लावे दीप घरी
दारामधली तुळस राहते
श्रीविष्णूच्या नित्य उरी

प्रिय ती त्यांची अलौकीकशी
राधा दामोदर नाती
तुलसीरूपामधे वरतसे
श्रीविष्णू वृंदेस कधी

रोज रातीला चढे रंग जरी
कुट्ट अंधाराचा कोठे
अंगणातली तुळस उजळते
तेज इवलुसे तरी मोठे

आजही आठवते मज आई
रोज रोजची ती सांजवात
अंगणात जो फिरतसे सदा
डोक्यावरूनी... मायेचा हात
तुझा सदोदित माया हात

दि. ०१/१२/२०२३
रात्री ११.१३ वा.



## (१००)
## त्या धुक्यातील त्या क्षणांना

त्या धुक्यातील त्या क्षणांना
अविरत मन आठवते
त्या झंकारांच्या गावाला
जगण्या पुन्हा पाठवते

तू तिथे मी तिथे
ती जवळीकता होती
नवीनवी स्पर्शाची
आगळीकता होती

लाजेच्या पडद्याला
साथ धुक्याची मिळाली
मिटता लोचने स्वप्नामधली
आस क्षणात कळाली

हातामध्ये धरता हात तू
शहारले अंगांग
फुलफुलावर उमटून झाले
कोमलतेचे दवांग

कधी वाटते अशा दवाने
प्रिया जवळ आणिले
रात धुक्याची पहाट धुकेरी
धुक्या तुला मानीले
प्रियतमासी तू जवळी आणिले...

दि. ०५/१२/२०२३
संध्याकाळी ०६.२८ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.** **(https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) - प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२-२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय–नवोदित – संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव – संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव – नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/ 7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924 672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार ‘साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला’ भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/ InfoVidarbha/status/ 1418559733921816 580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/ VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT LxInwuJc ; https:/ youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/ m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ‘‘सर्ग_निसर्ग’’ ऑडिओ अल्बम – ‘‘मंजुमंजिरी’’ | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ६८
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३५
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●